दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com

धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती | वर्ष ४ थे | अंक : ३०१ वा | रविवार दि. २७ ऑगस्ट २०२३ | किंमत : २ रु. | पृष्ठे : ६

## बॉईल्ड राईसवर २० टक्के निर्यात शुल्क

**मुंबई ।** केंद्र सरकारने कांद्यानंतर आता उकडलेल्या तांदळाच्या निर्यातीवर २० टक्के निर्यात शुल्क लावले आहे. पुरेसा स्थानिक



साठा राखणे आणि देशांतर्गत किमती नियंत्रणात ठेवण्याच्या उद्देशाने हे पाऊल उचलण्यात आले आहे. यापूर्वी सरकारने बासमती तांदूळ वगळता सर्व प्रकारच्या कच्च्या तांदळाच्या निर्यातीवर बंदी घातली आहे. निर्यात शुल्क लागू केल्यामुळे भारताच्या तांदळाच्या निर्यातीत घट होणार असून, त्यामुळे अमेरिका, थायलंडसह परदेशातील तांदळाच्या किमती वाढणार आहे.

## न्यूज कॉलम

### वीज कंपनी कर्मचाऱ्याला मारहाण

**नंदुरबार ।** शहरातील मोहाडी उपनगर परिसरातील अरिहंत नगरात थकीत वीज बील वसुलीसाठी वीज कंपनीचे पथक आले होते. या वेळी कर्मचारी वासुदेव लहू भोये (वय ४७) यांच्याशी गुरूदेवसिंग हरबक्षसिंग बैन्स, जोगनसिंग गुरुदेवसिंग बैन्स या पितापुत्राने वाद घालून शिवीगाळ दमदाटी करत मारहाण केली.

### वाहतूक मोहिमेत दहा हजारांचा दंड

**धुळे ।** शहर वाहतूक नियंत्रण पोलिस शाखेतर्फे शुक्रवारी प्रलंबित दंडवसुली मोहीम राबविण्यात आली. अवघ्या अर्ध्या तासात वाहनधारकांकडून दहा हजारांचा दंड वसूल केला गेला. शहर वाहतूक शाखेबाहेर बसस्थानकाजवळ बारापत्थर चौकात शहर वाहतूक शाखेचे सहाय्यक पोलिस निरीक्षक भूषण कोते यांनी जितेंद्र आखाडे, भागवत पाटील, विनोद पाटील, दत्तात्रय साळुंखे, जितेंद्र पाटील, नरेंद्र पवार, विवेक वाघमोडे, विलास मालचे, प्रसन्न पाटील, मतीन शेख यांच्यासह ही मोहीम राबविली. दंडात्मक मोहिमेतून शहरातील वाहतुकीला शिस्त लावावी, अशी मागणी जनमानसातून होत आहे.

# हस्ती बँकेच्या पिग्मी एजंटला लुटणारे सहा दरोडेखोर जेरबंद

### साक्री पोलिसांची कारवाई

**साक्री । प्रतिनिधी**

द हस्ती बँक को-ऑप शाखा साक्री च्या पिग्मी एजंटला लुटणाऱ्या सहा दरोडेखोरांना साक्री पोलिसांनी जेरबंद केले असून या कारवाईत दरोडेखारांकडून ३७ हजार ७०० रूपयांच्या रोकडसह ८ लाख १२ हजार ४०० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात साक्री पोलिसांना यश आले आहे.



### एका दिवसात गुन्ह्याची उकल

**यावेळी हस्ती बँकेचे चेअरमन दिलीप चोरडीया यांनी व्यापार्यांच्या वतीने पोलिसांचे विशेष आभार मानले. यावेळी नगरसेवक सुमित नागरे, साक्री स्थानकवासी संघाचे अध्यक्ष राजेंद्र मदनलाल संचेती, भारतीय जैन संघटनेचे धुळे जिल्हा अध्यक्ष सौ जोशीला पगारिया, साक्री शहर किराणा व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष कपिल पंजाबी, कापड व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष दिलीप टाटीया, डॉ. दिलीप चोरडिया, चंद्रकांत टाटिया, विनोद पगारिया, साक्री शहरातील व्यापारी उपस्थित होते.**

### ८ लाखांचा मुद्देमाल जप्त

**या कारवाईत पाच लाखाची स्वीफ्ट डिझायर कार, दोन लाख रूपये किंमतीच्या दोन बजाज पल्सर दुचाकी, ३६ हजार ७०० रूपयांची रोकड, २५ हजार रूपये किंमतीचे बालाजी कंपनीचे कलेक्शनचे मशिन, ५० हजार रूपये किंमतीचे पाच मोबाईल, २०० रूपये किंमतीचा लाकडी मुठ असलेला गावठी चाकू, ३०० रूपये किंमतीची गुप्ती व २०० रूपये किंमतीची एक लोखंडी पहार असा एकूण ८ लाख १२ हजार ४०० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी वरील संशयितांविरूध्द साक्री पोलीस ठाण्यात भादंवि कलम ३९५ व आर्म ॲक्ट ४/२५ प्रमाणे गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. तपास पोसई. गणेश कोळी यांना सोपविण्यात आला आहे.**

दि हस्ती बँकेत पिग्मी एजंट म्हणून कार्यरत असलेले प्रमोद पारखचंद टाटीया रा.लक्ष्मीरोड, साक्री हे दि.२४ ऑगस्ट रोजी दिवसभराचे काम आटोपून रात्री ९.२५ च्या सुमारास त्यांच्या मोटारसायकलने (एम.एच.१८/ एबी ७८५९) घराकडे जात होते. यावेळी त्यांच्यासोबत दिवसभराचे कलेक्ट केलेली १ लाख १० हजारांची रोकड व बालाजी कंपनीचे कलेक्शन मशीन कापडी पिशवीत ठेवलेले होते. घराकडे जात असताना समोरून एका पांढर्या रंगाच्या कारने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. संपूर्ण दिवसाची १ लाख १० हजार रुपयांचे कलेक्शन, बालाजी कंपनीचे कलेक्शन मशिन, पांढर्या रंगाच्या जाड कापडी पिशवीत ठेवून एम.एच.१८ ए.बी.७८५९ क्रमांकाच्या मोटरसायकलने घराकडे जात असताना पांढर्या रंगाच्या कारने मागून टाटीया यांच्या दुचाकीला धडक दिली. धडकेनंतर कार पेरेजपुर रोडकेडे निघून गेली. कारने धडक दिल्याने प्रमोद टाटीया हे खाली पडले. जवळच बाकावर बसलेल्या २१ ते २२ वयोगटातील मदत करण्याच्या बहाण्याने टाटीया यांच्या हातातील पिशवी घेवून ज्या दिशेने कार गेली. त्या दिशेने पलायन केले. या घटनेनंतर प्रमोद टाटीया यांनी साक्री पोलिसात फिर्याद दिली. भादंवि ३९२ प्रमाणे संशयीतांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला होता. पीआय निकम यांनी आरोपींच्या शोधासाठी वेगवेगळी पथके तयार केली. अवघ्या १५ तासात पीआय निकम यांच्या पथकाला यश आले. योगेश विजय पवार, गौरव विजय पवार दोघे रा.लोकमान्य नगर,साक्री,गणेश राजेंद्र देसले रा.गणेशनगर,साक्री,दीपक उर्मल पवार,दावल अरुण भवरे आणि संपत उर्फ संप्या अशोक मालचे रा.गढी भिलाटी साक्री या संशयीतांना ताब्यात घेतले. आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली असून त्यांच्याकडून ५ लाख रुपये किंमतीची जी.जे.१५ ए.डी.५५०१ क्रमांकाची कार,१ लाख १० हजार रुपये किंमतीची एम.एच.०४ इ.डब्ल्यु. ४६७४ क्रमांकाची मोटर सायकल, एम.एच.१८ बी.पी.६०५९ क्रमांकाची ९० हजार रुपये किंमतीची मोटरसायकल,३६ हजार ७०० रुपयांची रोकड, २५ हजार रुपये किंमतीचे बालाजी कंपनीचे कलेक्शन मशीन, ५० हजार रुपये किंमतीचे ५ मोबाईल, २०० रुपये किंमतीचा, चाकू, ३०० रुपये किंमतीची गुप्ती, २०० रुपये किंमतीची लोखंडी पहार असा ८ लाख १२ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.या गुन्ह्याचा तपास पीएआय गणेश कोळी करीत आहेत. ही कारवाई पोलिस अधिक्षक संजय बारकुंड,अपर पोलिस अधिक्षक किशोर काळे, डीवायएसपी साजन सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली साक्री पोलिस ठाण्याचे प्रभावी अधिकारी मोतीराम निकम,पीएसआय रोशन निकम,प्रसाद रौंदळ,गणेश कोळी, पोना संदीप सावळे, चेतन गोसावी,उमेश चव्हाण, रायते, संजय शिरसाठ, रामलाल अहिरे, शांतीलाल पाटील यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# राष्ट्रवादीत फूट नाही, माझ्या पक्षाचे धोरण मी सांगतो

### पवारांचे वडेट्टीवार, राऊतांना खडेबोल

**मुंबई । प्रतिनिधी**



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट नाहीच, असे राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख शरद पवार यांनी आज पुन्हा ठणकावून सांगितले. तसेच, काही आमदारांनी वेगळी भूमिका मांडली म्हणून पक्ष फुटला असे म्हणता येत नाही. कारण पक्ष म्हणजे आमदार नव्हे, अशी भूमिका शरद पवारांनी मांडली.

राष्ट्रवादीत फूट नाही, या शरद पवारांच्या वक्तव्यावर शुक्रवारीही चांगलाच गदारोळ उडाला. राष्ट्रवादीचे दोन प्रदेशाध्यक्ष आहेत, ही फूट नाही तर काय? असा सवाल काँग्रेस नेते व राज्याचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला होता. तर, संजय राऊत यांनीही अजित पवार गटाने पक्षाच्या अध्यक्षपदावरून शरद पवारांची हकालपट्टी केली. त्यामुळे राष्ट्रवादी पक्षातही शिवसेनेप्रमाणे फुट पडली असल्याचे आम्ही मानतो, अशी प्रतिक्रिया दिली होती. त्यावर मी राष्ट्रवादीचा प्रमुख आहे. माझ्या पक्षाचे धोरण मी सांगतो, असे शरद पवारांनी सुनावले. तसेच, राष्ट्रवादीत फूट असल्याचा दावाही पुन्हा फेटाळून लावला. शरद पवार म्हणाले, आमच्यापासून काही आमदार वेगळे झाले ही वस्तुस्थिती आहे. मात्र, त्यांनी फक्त पक्षाच्या विचारसरणीहून वेगळी भूमिका घेतली असे म्हणता येईल. ते आमदार काही पक्षातून फुटून गेले नाहीत. तुम्हीच आठवून बघा तीन महिन्यांपूर्वी राष्ट्रवादीचे अध्यक्ष म्हणून तुम्ही कोणाची प्रतिक्रिया घेत होतात. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष म्हणून तुम्ही कोणाची प्रतिक्रिया घेत होतात?

तसेच, आमचे काही सहकारी आम्हाला सोडून गेले तेव्हा त्यांची पहिली पत्रकार परिषदही आठवून पाहा. पक्षाचा अध्यक्ष शरद पवार असल्याचेच त्यांनी सांगितले होते. शरद पवार म्हणाले, पक्ष म्हणजे काय? फूट याचा खरा अर्थ काय? हे तुम्ही समजावून घ्या. पक्ष म्हणजे आमदार नव्हे तर पक्ष ही संघटना असते. देश पातळीवर ज्याच्या हाती पक्षाची संघटना पक्ष त्याचा. आता राष्ट्रवादी पक्ष, संघटनेचे अध्यक्ष इथे तुमच्यासमोर बसलेले आहेत. देशाच्या संघटनेचे अध्यक्ष तुमच्यासमोर आहेत. पक्षाचे राज्याचे अध्यक्ष जयंत पाटील हे आहे. मागील नऊ वर्षांच्या कार्यकाळात तसेच पुढील एक वर्षात केंद्र सरकारकडून जी धडाडीने कामे होणार आहेत, ती बघता राष्ट्रवादीचे अध्यक्ष खासदार शरद पवार आणि खासदार सुप्रिया सुळेही मोदींचे नेतृत्व मान्य करून भाजपसोबत येतील, असे भाकीत भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुक्रवारी अमरावतीमध्ये केले. तसेच, मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनीही शरद पवारांची वाटचाल ही एनडीएकडे सुरू असल्याचे म्हटले होते. या दोन्ही नेत्यांच्या वक्तव्याचा शरद पवारांनी आज खरपूस समाचार घेतला.

# नाशिकमध्ये टोळक्यांची दहशत, समाज कंटकांकडून वाहनांची तोडफोड

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक शहरातील सिडको परिसरात गुंडाचा हैदोस सुरूच असून गुरुवारी खुनाची घटना घडली. याबरोबर मागील पंधरा दिवसांत चार खुनाच्या घटना समोर आल्या. या पार्श्वभूमीवर नाशिक पोलिसांनी तातडीने पावलं उचलत सिडको भागात गस्तीपथकच तैनात करण्यात आले. मात्र हे सर्व सुरु असतानाच काल रात्री उशिरा काही गुंडानी याच भागातील गाड्यांची तोडफोड केल्याची घटना समोर आल्याने परिसरात दहशत पसरली आहे. ही सगळी घटना परिसरात असलेल्या सीसीटीव्हीमध्ये कैद झाली आहे.

नाशिक शहरातील गुन्हेगारी काही कमी होण्याचे नाव घेत नसून दोनच दिवसांपूर्वी भाईगिरीच्या वादातून एकाला संपविण्यात आल्याची घटना घडली. इन्स्टाग्रामवरील रिल्सच्या चढाओढीतून हा खून झाल्याचे पोलीस तपासात समोर आले. ही घटना सिडको परिसरात घडली. याच परिसरात मागील काही दिवसांपासून सातत्याने खून, हाणामारीच्या घटना समोर येत असून या पार्श्वभूमीवर नाशिक पोलीस यंत्रणा सतर्क झाली आहे. सिडकोतील गुन्हेगारी रोखण्यासाठी एकीकडे पोलीस आयुक्तांनी २५ पोलिसांचे गुंड विरोधी पथक सिडकोत तैनात केले. या पथकाने सिडकोतील रस्त्यावरून शुक्रवारी सायंकाळनंतर रात्रीपर्यंत गस्त घातली. त्या परिसराच्या जवळच गुंडांनी तब्बल १५ वाहनांची तोडफोड करत पोलिसांच्या गुंडाविरोधी पथकाला



आव्हानच दिले. दरम्यान, या घटनेमुळे छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात नागरिकांमध्ये भीती पसरली असून सिडकोतील छत्रपती शिवाजी महाराज चौक, अचानक चौक, साईबाबा मंदिराच्या मागील बाजूला गुंडांनी दहशत माजवत वाहनांवर दगडफेक करत काचा फोडण्याची घटना समोर आली आहे.

**सिडकोत गुंडविरोधी पथक तैनात...**

सहाय्यक पोलीस आयुक्त शेखर देशमुख यांना देखील अंबड पोलीस ठाण्याच्या आवरातच तळ ठोकण्याची आणि त्यांचे कार्यालय शरणपूररोड येथून अंबडला चालवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सिडको शिवाजी चौकात भर दिवसा गुरुवारी संदीप आठवले या तरुणाचा खून करण्यात आल्याची घटना घडली. या घटनेनंतर पोलीस यंत्रणा ॲक्टिव्ह मोडवर आल्याचं पाहायला मिळत आहे. मात्र काल रात्री उशिरा अकरा ते साडे अकरा वाजेच्या सुमारास तीन ते चार गुंडांनी परिसरात दहशत माजवण्याचा प्रयत्न केला. यात तीन ते चार कारच्या काचा फोडण्यात आल्या. तर दुचाकी रस्त्यात ढकलून त्याचीही तोडफोड करण्यात आली.

# वार्सा फाट्यावर ९७ हजारांचा गुटखा जप्त

### पिंपळनेर पोलिसांची कारवाई

**पिपळनेर । प्रतिनिधी**

साक्री तालुक्यातील वार्सा फाट्यावर दि.२४ ऑगस्ट रोजी सायंकाळी सात वाजेच्या सुमारास करण्यात आलेल्या कारवाईत ९७ हजार रूपये किंमतीचा गुटखा पिंपळनेर पोलिसांनी जप्त केला.

पिंपळनेर पोलीस ठाण्याचे प्रभारी निरिक्षक श्रीकृष्ण पारधी यांना दि.२४ ऑगस्ट रोजी मिळालेल्या गुप्त माहितीनुसार पथकाने साक्री तालुक्यातील वार्सा फाट्याजवळ सापळा रचला. यावेळी संशयित मोहम्मद अनिस मोहम्मद हनीफ मोमीन रा.निशांत मुलींच्या शाळेजवळ इस्लामपुरा, मालेगाव हा त्याचे ताब्यातील वाहनात येताना दिसताच त्यास थांबण्याचा इशारा केला. पोलिसांची चाहुल लागताच मोहम्मद मोमीन हा वाहन रस्त्याच्या कडेला लावुन पसार झाला. पथकाने वाहनाची तपासणी केली असता वाहनात ९४ हजार रूपये किंमतीचा विमल गुटखा व तीन हजार रूपये किंमतीची तंबाखु असा एकूण ९७ हजार रूपये किंमतीचा मुद्देमाल आढळून आला. अधिक तपासात मोहम्मद मोमीन यास दि.२५ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६.०६ वाजता ताब्यात घेण्यात आले. अन्न व औषध प्रशासनातील सुरक्षा अधिकारी किशोर बावीस्कर यांच्या फिर्यादीवरून मोहम्मद मोमीन याचेवर गुटखा प्रतिबंधक अधिनियमानुसार गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. तपास पोसई बी.जी. शेवाळे यांना सोपविण्यात आला आहे. सदरची कारवाई जिल्हा पोलीस अधिक्षक संजय बारकुंड, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे, एएसपी एस.ऋषीकेश रेड्डी, उपविभागीय पोलीस अधिकारी साजन सोनवणे, पिंपळनेर पोलीस ठाण्याचे प्रभारी एपीआय श्रीकृष्ण पारधी यांचे मार्गदर्शनाखाली पीएसआय मालचे, पोसई बी.जी.शेवाळे, सोमनाथ पाटील, नरेंद्र माळी या पथकाने यशस्वीरित्या पार पाडली.

# उच्च न्यायालयाच्या निकालाने सार्वजनिक वाचनालयात नवा पेच

**नाशिक । प्रतिनिधी**

सार्वजनिक वाचनालयाचे माजी अध्यक्ष विलास औरंगाबादकर यांनी केलेला कारभार पूर्णपणे बेकायदेशीर असून वाचनालयाच्या सन २०१० ते २०२२ या कालावधीचा निवडणुकीचा बदल अर्ज अवैध असल्याचा धर्मादाय आयुक्तांचा निर्णय हा उच्च न्यायालयाने कायम केला असून आतातरी सावाना पदाधिकारी कायदा पाळणार का? या चर्चेला उधाण आले आहे.

अध्यक्षांना घटनेनुसार कोणताही अधिकार नसताना खोटी कागदपत्रे तयार करून विलास औरंगाबादकर यांनी मिलिंद जहागिरदार, विनया केळकर आणि स्वानंद बेदरकर यांचे वाचनालयाचे सभासदत्व रद्द केले होते व त्यांना निवडणूकीपासून वंचित ठेवले होते. त्याबद्दल त्यांनी न्यायालयात दाद मागितली. त्यावर सन २०१६-२०२२ या कालावधीच्या निवडणूकीच्या बदल अर्जाची धर्मादाय उपायुक्त, नाशिक यांच्या समोर सखोल चौकशी होऊन तत्कालिन सहाय्यक धर्मादाय आयुक्त कांचनगंगा सुपाते यांनी औरंगाबादकर यांचे वर्तन बेकायदेशीर ठरवून अनेक गोष्टींचा खुलासा करणारा तसेच निवडणूक बेकायदेशीर आहे असे ठरवणारा निकाल दिला होता; मात्र आपली अशी बेकायदेशीर ठरलेली कार्यकारणी कायम राहावी या हेतूने त्या निकालाविरुद्ध धर्मादाय सहआयुक्तांकडे वाचनालयाने दाद मागितली.

धर्मदाय सहआयुक्तांनी त्यात बेकायदेशीर





**वाचनालयाचे माजी अध्यक्ष विलास औरंगाबादकर यांनी पूर्णपणे बेकायदेशीर कारभार करून आमच्यावर अन्याय केला हे आता उच्च न्यायालयाच्या निकालावरून स्पष्ट झाले आहे. विद्यमान अध्यक्ष दिलीप फडके आमच्यावर अन्याय होऊ देणार नाही; असा आम्हाला विश्वास आहे. - मिलिंद जहागीरदार**

सभासदांचे म्हणणे ऐकून घ्यावे या कारणावरून फेरचौकशीचा निकाल दिला. त्या निकालाविरुद्ध जहागीरदार, केळकर, बेदरकर यांनी धर्मादाय सहआयुक्त झपाटे यांच्या निकालावर उच्च न्यायालयात रिट पिटीशन करून दाद मागितली.

त्याचा निकाल या तिघांच्या बाजूने लागला आहे. उच्च न्यायालयाने सदर रिट पीटिशन मंजूर करून धर्मादाय सहआयुक्तांचा निकाल फेटाळून लावत धर्मादाय उपायुक्त कांचनगंगा सुपाते जाधवांचा निकाल कायम केला आहे. जहागीरदार, केळकर, बेदरकर यांच्यावतीने धर्मादाय आयुक्त न्यायालयात ॲड. विनयराज तळेकर यांनी तर उच्च न्यायालयात ॲड. उदय वारुंजीकर यांनी काम पाहिले.

# राष्ट्रवादीमुळे काँग्रेस–शिवसेना परेशान, शरद पवारांनी एकदाचा निर्णय घ्यावा

### गिरीश महाजन यांचा सल्ला

**नाशिक । प्रतिनिधी**

शरद पवार यांनी कार्यकर्त्यांना संभ्रमात टाकू नये, त्यांच्या नेत्यांनी एकत्र येऊन एकदाचा निर्णय घ्यावा. सकाळी काय बोलतात, दुपारी काय बोलतात, भाषणात वेगळच बोलतात, दुसरीकडे म्हणतात, त्यांचा-आमचा प्रश्न मिटला आहे, त्यामुळे लोक, कार्यकर्ते संभ्रमात असून काँग्रेस-शिवसेना राष्ट्रवादीमुळे तर परेशानच झाली आहे. त्यामुळे दोघांमध्ये एकवाक्यता ठेवावी, स्वत:मध्ये एकवाक्यता ठेवावी, असा सल्लाही गिरीश महाजन यांनी राष्ट्रवादीच्या नेत्यांना दिला आहे.



### निर्यात शुल्क पूर्णपणे रद्द होणार नाही

**निर्यात शुल्क पूर्णपणे रद्द होणार नाही, सरकार तसा निर्णय करणार नाही, असं जर केलं तर निर्यात शुल्क कमी झालं आणि सगळ्या कांदा बाहेर गेला तर येणार वर्ष अवघड जाईल, पाऊस नाही, कांदा लागवड झालेली नाही. वर्षभरात कांद्याचं शॉर्टेज होण्याची शक्यता आहे. मग राज्याच्या लोकांना आपण काय देणार असा प्रश्न महाजन यांनी उपस्थित केला. मग शंभर रुपये झालेला कांदा चालेल का? सव्वाशे रुपये झालेला कांदा चालेल का? असा सवाल उपस्थित करत शेतकऱ्यांसह ग्राहकाचे हित साधलं गेलं पाहिजे. या दोघांमध्ये समन्वय राखून हा निर्णय घेतला आहे. विजय वडेट्टीवार शरद पवार यांनी जी मागणी केली, की कांद्याला चार हजार रुपये भाव द्या, मग तुमचं सरकार असताना शेतकऱ्यांना शंभर रुपयांच्यावर अनुदान दिलं नाही, या सरकारने साडेतीनशे रुपये अनुदान दिले, आज ना उद्या हे पैसे देखील शेतकऱ्यांच्या खात्यावर पडणार आहेत. त्यामुळे लोकांमध्ये संभ्रम निर्माण करू नये, असे आवाहन गिरीश महाजन यांनी दिले.**

आज ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी नाशिकच्या लासलगाव बाजार समितीत जाऊन शेतकरी व्यापाऱ्यांची भेट घेत चर्चा केली. यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी ते बोलत होते महाजन म्हणाले की केंद्र सरकारने कांद्याच्या संदर्भात चोवीस ते दहा रुपये इतका विक्रमी भाव दिला आहे त्यानंतर सुद्धा शेतकऱ्यांकडून आंदोलन, रास्ता रोको केला जात आहे. लासलगाव येथे शेतकऱ्यांसोबत कांदा प्रश्नावर चर्चा केली. २४१० रुपये भाव दिल्यानंतर शेतकऱ्यांमध्ये असंतोष दिसून येत आहे. त्यामुळे नाफेडची कांदा खरेदी केंद्र वाढवावी लागणार आहे, शेतकऱ्यांना दिलासा द्यावा लागेल, नाफेडच्या माध्यमातून खरेदी होत असताना व्यापाऱ्यांचा भलं होत असल्याचा आरोप लोकांकडून केला जात असल्याचं महाजन म्हणाले. प्रत्यक्षात फायदा शेतकऱ्यांना होत नाही. त्यामुळे याबाबत सखोल चौकशी करू, असे आश्वासन देखील यावेळी महाजन यांनी दिले.

कांदा शेतकऱ्यांचा प्रत्यक्ष कथा घेतला जाईल त्याला भाव कसा मिळेल याबाबत सर्वतोपरी प्रयत्न शासनामार्फत केले जातील कांदा खरेदी ही शेतकऱ्यांसमोर झाली पाहिजे मागण्या शेतकऱ्यांचा असून याबाबत मुख्यमंत्र्यांशी देखील चर्चा झाली आहे. त्याचबरोबर कायमस्वरूपी या शेतकऱ्याचा दिलासा कसा देता येईल तर कांदा चाळी वाढल्या पाहिजेत, त्याच्यावर अनुदान वाटलं पाहिजे, शेतकऱ्यांची साठवण क्षमता वाढली पाहिजे, भाव वाढले असताना हाच कांदा शेतकऱ्यांना बाजारात आणता येईल, असेही महाजन म्हणाले.

# महिलेची बॅग कापून सव्वा तोळ्यासह रोख रक्कम लंपास

**पिंपळनेर । प्रतिनिधी**

एसटी महामंडळाची नंदूरबार बस स्थानकावर महिलेच्या बॅगमधून सव्वा तोळ्यांच्या दागिन्यांसह रक्कम चोरी झाल्याची घटना घडली. बसमध्ये चढताना गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी ही चोरी झाल्याची माहिती महिलेने दिली आहे. या चोरीनंतर नंदुरबार बसस्थानक परिसरात पोलिसांची गस्त वाढवावी अशी मागणी प्रवाशांनी केली आहे.

विजयाबाई जगदीश रोकडे (रा. घनश्यामनगर सुरत) या नंदुरबार बस स्थानकावरून दुपारी २.४५ वाजताच्या सुमारास नंदुरबार- नाशिक बसने पिंपळनेर येथे जात होत्या. बंधु सुभाष जगताप यांच्याकडे रक्षाबंधनासाठी जात असताना बसमधे चढतांना त्यांच्या दोन्ही हातात बॅगा होत्या. यावेळी बसमध्ये चढताना गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी उजव्या हातातील बॅग एका बाजूने कापली. त्यानंतर बॅगमधील सव्वा तोळ्याची सोनपत व ३५०० रुपये रोख चोरट्यांनी लंपास केले. त्यामुळे बस स्टॉपवरील प्रवाशांमध्ये भिती पसरली असुन नंदुरबार पोलिसांनी बसस्टॉपवर गस्त वाढवावी व पाकिटमार, सोनपोत लांबवणा-या चोरट्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी होत आहे.

## 'मूडीज्'चा इशारा

विकास दरावरून देशाची स्थिती चांगली आहे, असे मानता येत नाही. मुस्लिम व ख्रिश्चनांवर होणारे हल्ले, मणिपूर मधील स्थिती यांवरही जगाचे लक्ष असते. असंतोष दडपला जातो हेही परदेशी गुंतवणूकदार लक्षात घेतात.

देशाची अर्थव्यवस्था वेगाने विकास साधत आहे, देशात सामाजिक सौहार्द आहे, असे केंद्र सरकार सतत सांगत असते. जगात आपली प्रतिमा उजळ व्हावी या हेतूने, विशेषत: 'जी-२०'च्या अध्यक्षपदाच्या काळात असे सांगितले जाणे स्वाभाविक आहे; पण त्याचा अर्थ जग ते मान्य करते असे नाही किंवा आपली अर्थव्यवस्था भक्कम आहे असेही नाही. आर्थिक व्यवहारांखेरीज अन्य घटकही अर्थव्यवस्थेच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावत असतात. 'मूडीज'या अमेरिकन संस्थेने गेल्या आठवड्यात भारताचे पतमानांकन 'बीएए-३'या पातळीवर कायम ठेवले आहे. गुंतवणुकीच्या दृष्टीने देशाची स्थिती 'स्थिर' असल्याचेही मूडीजने म्हटले आहे. २०२० मध्ये ही स्थिती 'नकारात्मक' असल्याचे या संस्थेने जाहीर केले होते. 'जी-२०' गटातील बहुतेक सर्व देशांपेक्षा भारताचा आर्थिक विकासाचा दर 'किमान दोन वर्षे' तरी जास्त राहील, असा अंदाजही मूडीजने व्यक्त केला आहे. केंद्र सरकार मूलभूत सेवा-सुविधांवर करत असलेला जादा खर्च, पायाभूत डिजिटल यंत्रणा (इन्फ्रास्ट्रक्चर) याबद्दल समाधान व्यक्त करून भारताची अर्थव्यवस्था वेगाने वाढेल, असे मूडीजने म्हटले आहे; पण गेल्या सात ते १० वर्षांत संभाव्य विकास कमी झाल्याचेही तिने नमूद केले आहे. संस्था एवढ्यावरच थांबलेली नाही.

असहिष्णुता, हिंसा

'मूडीज'ने आपल्या ताज्या अहवालात भारताचे केवळ कौतुक केलेले नाही. भारतावरील वाढत्या कर्जाची नोंद अहवालात आहे. देशातील सामाजिक परिस्थितीचाही उल्लेख केला आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. नागरी समूहाचा (सिव्हिल सोसायटी) व राजकीय असंतोष दडपणे, या बरोबरच सामाजिक तेढ वाढणे यांचा परिणाम घटनात्माक संस्थांच्या दर्जावर होत असल्याचे संस्थेने म्हटले आहे. राजकीय तणाव वाढणे आणि/अथवा विविध घटकांची परस्परांवर नियंत्रण ठेवण्याची व्यवस्था दुबळी होणे यामुळे देशाचे पतमानांकन घटू शकते असा इशारा देण्यात आला आहे. देशात विरोधकांचा अवकाश आक्रसत आहे, सरकार विरुद्ध असंतोष व्यक्त करता येत नाही याबद्दल अनेक देशांनी, संस्थांनी या पूर्वीही चिंता व्यक्त केली आहे. त्या बहुतेक संस्था लोकशाही व्यवस्थेवर लक्ष ठेवणार्या, राजकीय तसेच सामाजिक स्थितीचे निरीक्षण करणार्या आहेत. आंतरराष्ट्रीय गुंतवणूकदारांना मार्गदर्शन करणारी 'मूडीज' ही संस्था आहे. केंद्र किंवा राज्य सरकारांच्या जमा-खर्चाखेरीज अन्य अनेक घटक परदेशी गुंतवणूकदारांच्या निर्णयावर प्रभाव टाकत असतात. भारतात गुंतवणूक करण्यातील राजकीय धोका वाढत असल्याचे या संस्थेने म्हटले आहे. त्यासाठी 'गटांची विभागणी' म्हणजेच ध्रुवीकरण असंतोष व्यक्त करण्यावर होणारे हल्ले, यांचे उदाहरण तिने दिले आहे. गो मांसाची वाहतूक करण्याच्या संशयाने तथाकथित गो रक्षकांकडून अल्पसंख्याक समाजातील व्यक्तींवर होणारे हल्ले व हत्या यांना जगभर प्रसिद्धी मिळाली आहे. मोदी सरकारवर टीका करणारे पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते यांना तुरुंगात डांबण्याच्या घटना लपून राहिलेल्या नाहीत. कथित धार्मिक मेळाव्यात होणारी विद्वेषपूर्ण भाषणे यांनाही मोठी प्रसिद्धी मिळते. या सर्वांचे सत्ताधारी पक्षातील व्यक्ती उघड समर्थन करत असतात, याची नोंद परदेशी संस्था व संघटना घेत असतात याचे भान केंद्र सरकार व भाजपने ठेवले पाहिजे. कायदा मंत्र्याचे पद सांभाळणारी व्यक्ती सातत्याने सर्वोच्च न्यायालयावर टीका करण्याच्या अनेक घटना अलीकडे देशाने पाहिल्या. न्यायालयाचा प्रत्येक निर्णय केंद्र सरकारच्या बाजूने आला पाहिजे, तसा निर्णय न देणारा न्यायाधीश जणू देशविरोधी आहे असे चित्र निर्माण करण्याचा प्रयत्नही झाला व होत आहे. राजकीय बहुमत म्हणजेच स्थिर लोकशाही असे सध्या भासवले जात आहे. विधिमंडळ, न्याय संस्था व प्रशासन यांचा परस्परांवर अंकुश राहावा अशी व्यवस्था लोकशाहीत असते; पण बहुमताच्या बळावर या संस्था दुबळ्या करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. भारतात 'निवडून आलेली एकाधिकारशाही' आहे, असे मत त्यामुळेच व्यक्त झाले. देशातील लोकशाही नाजूक आहे आणि त्यावर जगाचे लक्ष आहे हे मूडीज्च्या इशार्याने स्पष्ट झाले आहे.

# साप्ताहिक उद्योजक विकास बैठकीतून २५ कोटी रुपयांची व्यवसाय प्राप्ती



मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या राजर्षी शाहू महाराज पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये दर बुधवारी, सकाळी आठ वाजता उद्योजकांची बैठक आयोजित केली जाते. बैठकीत सुरुवातीला ३० सेकंदात प्रत्येकाला परिचय करून देण्याचे सांगण्यात येते. उद्योग व्यवसायिक आपल्या उद्योगव्यवसायासंबंधी माहिती सांगण्याबरोबर कोणत्या क्षेत्रात व्यवसायातील वृद्धीला संधी आहेत, याविषयीची माहिती देतात. जवळपास १०० विविध व्यवसायातील उद्योजक या बैठकीला उपस्थित असतात.

उपस्थितांमध्ये हॉटेल व्यवसायिक, विविध मॅन्युफॅक्चरिंग युनिटचे प्रमुख, सप्लायर्स, गारमेंट फॅक्टरीचे प्रमुख, सेवा क्षेत्रात काम करणारे व्यवसायिक, बांधकाम व्यवसायिक यांसारख्या जवळजवळ सर्व क्षेत्रातील उद्योजक उपस्थित असतात. परस्पर परिचयानंतर एका यशस्वी उद्योजकाचे अर्धा तासाकरिता त्याच्या उद्योगधंद्याविषयी सादरीकरण होते. उपस्थित सर्व उद्योजकात प्रश्नोत्तराचा कार्यक्रम होतो. यानंतर नेटवर्किंगसाठी सर्वजण चहाला जमतात. या काळात सर्वांचा आपसात परिचय झालेला असतो .आपल्याकडे उपलब्ध असलेल्या व्यवसायाच्या संधी विषयी दुसर्‍यांना अवगत केले जाते. या बैठकीमध्ये एकत्रित आलेले उद्योजक परिचय झालेल्या उद्योजकांच्या युनिटला भेट देऊन तेथील व्यवसायाच्या संधी विषयी चर्चा करतात. आपल्या व्यवसायाविषयी माहिती देतात या देवाण-घेवानातून फार मोठ्या प्रमाणावर व्यवसायाच्या संधी निर्माण होतात. गुजराथी भाषेत एक म्हण आहे, ओळख ही सोन्याची खान आहे, खरोखर जगातील सर्वाधिक व्यवसाय संधींची निर्मिती, नेटवर्किंगमुळे- ओळखींमुळे होते. नेमकी साप्ताहिक बैठकीत नेटवर्किंग ही व्यवसायाची मूलभूत गरज साध्य होऊन त्यातून फार मोठा व्यवसाय निर्माण होतो आहे. अनेक वित्तीय संस्था तसेच बँकस चांगल्या ग्राहकाच्या शोधात असतात व आपल्या ग्राहकाला ते चांगले ग्राहक सूचना विषयी विनंती करतात. येथे जमलेले उद्योजक आपल्या बँकेला चांगला व्यवसाय असलेल्या व्यक्तीची माहिती देतात तसेच त्याचा परिचय करून देतात. त्यातून उद्योजकाला व्यवसायासाठी ऋण प्राप्त होते, त्याचबरोबर बँकेला उत्तम ग्राहक मिळतो.

साप्ताहिक बैठकीमुळे विविध अंगानी व्यवसायाची वाढ होत आहे. तीन महिन्यांपासून उद्योजकांची हा उपक्रम सुरु असून परस्परांच्या संपर्कातून एकमेकाला दिलेला व्यवसाय आता २५ कोटी पेक्षा जास्त झाला आहे .या वर्षभरत तो १०० कोटी पर्यंत जाईल असा अंदाज आहे. बैठकीदरम्यान राजश्री शाहू महाराज पॉलिटेक्निकचे प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित असतात. प्राध्यापक व विद्यार्थी विविध व्यवसायिकांशी आपला परिचय करून घेतात. या परिचयातून व्यवसायिकांना गेस्ट लेक्चरसाठी आमंत्रित केले जाते. त्यांच्या उद्योगाला विद्यार्थ्यांच्या भेटी आयोजित केल्या जातात. विद्यार्थ्यांच्या प्रकल्पावर उद्योगव्यवसायिक मार्गदर्शन करतात.



शब्द संवाद

**प्राचार्य प्रशांत पाटील**
(नाशिक) मो.९५१११८५९९३९

स्टार्टअप सुरू करू इच्छिणार्‍या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळते. कॉलेजच्या विविध लॅब सर्व व्यवसायिकांसाठी २४ तास खुल्या असल्याविषयी उद्योग व्यवसायिकांना अवगत केले जाते. इंडस्ट्री इन्स्टिट्यूट इंटरॅक्शनच्या या मॉडेल मधून व्यवसाय वाढण्यासोबतच येणार्‍या काळात अनेक विद्यार्थी उद्योजक तयार होतील यात शंका नाही. मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे राजश्री शाहू महाराज पॉलिटेक्निक शहराच्या मध्यभागी, गंगापूर रोड येथे उदोजी महाराज बोर्डिंग, परिसरात असल्यामुळे सर्वांना नाशिक शहरातून तसेच आजूबाजूच्या तालुक्यातून येणे सोयीचे होते. कॉलेज परिसरात कार पार्किंग साठी भरपूर जागा असल्यामुळे तसेच बैठकीसाठी सर्व प्रकारच्या सुविधा कॉलेजला उपलब्ध असल्यामुळे उद्योजक बैठकीचे आयोजन सोयीचे झाले आहे. नवीन शैक्षणिक धोरणाप्रमाणे नोकरी करण्यापेक्षा नोकरी देणारे विद्यार्थी यातून नक्कीच तयार होतील असा विश्वास वाटतो. उद्योजक विकास संस्थेचे सर्व पदाधिकारी तसेच कॉलेजमधील प्राध्यापक व विद्यार्थी उद्योजक बैठक यशस्वी करण्यासाठी प्रयत्नशील असतात.

# नाशिककरांना अनुभवता येणार एक अनोखी पर्वणी

शिवसेना नाशिक महानगर, ऊर्जा युवा प्रतिष्ठान यांच्या संयुक्त माध्यमातून शनिवारी दि. ९ सप्टेंबरला 'नाशिक ढोल ताशा महोत्सव २०२३' चे आयोजन

कोणतेही मंगल कार्य असो, उत्सव असो की सण-समारंभ, महाराष्ट्रात ढोल ताशा वाजला नाही तर तो उत्सव साजरा झाला असे वाटतच नाही. आपल्या मांगल्याचे प्रतिक असणारे हे ढोल ताशा वादन ऐकणार्‍या प्रत्येकाला ठेका धरायला अन् पाय थिरकायला लावले नाही तर नवलच. हेच महत्व अधोरेखित करण्यासाठी व नाशिकचा डंका जगभर गाजविणार्‍या 'नाशिक ढोल'चा सन्मान करण्यासाठी शिवसेना नाशिक महानगर आणि ऊर्जा युवा प्रतिष्ठान घेऊन येत आहे नाशिक ढोलताशा महोत्सव २०२३ - जल्लोष तरूणाईचा आयोजित करण्यात आला आहे.

येत्या शनिवार दि. ९ सप्टेंबर ठक्कर डोम नाशिक येथे नाशिककरांना या ढोल ताशा महोत्सवाच्या माध्यमातून अनोखी पर्वणी साधण्याची संधी मिळणार आहे. महाराष्ट्रातला ढोल ताशा म्हटला की, प्रामुख्याने आठवतात ते पुणेरी ढोल आणि नाशिक ढोल पथकं. पुरातन काळाशी नाते सांगणार्‍या ढोल-ताशा, शंख-झांजा आणि ध्वजाशी घट्ट नाळ असणार्‍या आपल्या ढोल-ताशा पथकांनी आपल्या वादनातून एका अर्थाने सांस्कृतिक ओळख निर्माण केली आहे. अशा पथकांचे श्री गणेश विसर्जन मिरवणूक आणि छत्रपती शिवाजी महाराज जयंतीला लयबद्ध-तालबद्ध वादन ऐकणे ही जणू एक पर्वणीच ठरत असते.

छत्रपती शिवाजी महाराजांचा जयजयकार आणि नाशिक ढोलचा दणदणाट असा जल्लोष आता प्रत्येक उत्सवात अनुभवायला मिळतो. लयबद्ध ताल आणि ठेका या वैशिष्ट्यांवर आधारीत असलेला हा ढोल संगीत विश्वाची संस्कृती अधिक समृद्ध करतोय. शंख, झांज, टाळ आणि भला मोठा ढोल असा साजशृंगार असलेल्या नाशिक ढोलची जादुई नजाकत म्हणूनच काही औरच असते. असंख्य




चित्रपटातील गाण्यांमध्ये नाशिक ढोलचा डंका वाजलेला आपण अनुभवले आहे.

'रुद्राक्षांपासून द्राक्षापर्यंत, मंदिरांचे शहरापासून ते पर्यटन शहरापर्यंत, गड किल्यांपासून आयटी हब पर्यंत, चवदार मिसळपासून ते वाईन कॅपिटलपर्यंत नाशिक आज जगभरात नावलौकीक वाढत आहे. यात नाशिकचे आणखी एक महत्वाचे बलस्थान म्हणजे नाशिक ढोल. देशभरात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये नाशिक ढोलचा डंका गाजतो. हेच बलस्थान लक्षात घेत नाशिक ढोलचा लौकीक अधिक जोमदारपणे पोहचविण्यासाठी नाशिक ढोलच्या सन्मानार्थ शिवसेना नाशिक महानगर आणि ऊर्जा युवा प्रतिष्ठानतर्फे या महोत्सवानिमित्त ढोलताशांच्या सादरीकरण आयोजित करण्यात आले आहे. यात विविध स्पर्धकांनी, मंडळांनी सहभाग घ्यावा; शिवाय स्पर्धकांची जुगलबंदी बघण्यासाठी नाशिककरांनी सहकुटुंब महोत्सवाचा आस्वाद घ्यावा.''असे आवाहन शिवसेना नाशिकचे जिल्हाप्रमुख व ऊर्जा युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष अजय बोरस्ते यांनी केले आहे.


नाशिक ढोल ताशा महोत्सव २०२३ ही स्पर्धा नसून सादरीकरण आहे. या महोत्सवात ढोल ताशांचे लयबंध व तालबद्ध विशेष सादरीकरण करणार्‍या ढोल पथकांना रुपये १,११,०००, ५१,००० व ३१,००० रोख व सन्मानचिन्ह, बरोबरच उत्कृष्ट ढोलवादक, उत्कृष्ट तालवादक, उत्कृष्ट ध्वजधारी तसेच उत्कृष्ट टोलवादक ही विशेष पारितोषिकेही देण्यात येणार असून नाव नोंदणीची शेवटची तारीख सोमवार दि. ४ सप्टेंबर सायंकाळी ५ वाजेपर्यंत आहे.

स्पर्धेत सहभागी होण्याचे निकष

- प्रत्येक ढोल पथकांत किमान २५ ते ३० ढोल असावेत.
- सात ताशे वाद्य असावेत.
- एक टोल आणि शंख असावा.
- प्रत्येक पथकास सदरीकरणासाठी १२ मिनिटे वेळेचे बंधन असेल.
- प्रत्येक मंडळाने वादकाचे फोटो, पत्ता, मोबाईल क्रमांक आयोजकांकडे द्यावा.
- परीक्षकांचा निर्णय अंतिम असेल.

**अधिक माहितीसाठी संपर्क :-**
प्रसन्ना तांबट - ९८२३५५४५२०,
शिवसेना मध्यवर्ती कार्यालय नाशिक - ७०२०८४०८६९,
ऊर्जा युवा प्रतिष्ठान - ९०२१९८६९६७.

## शब्दकोडे-१६१



**आडवे शब्द**

२. शेवट, मावळणे ३. अकबराशी शर्थीने लढणारा शूर राजपूत ७. ताठा ८. प्रतिबंध १०. समेट ११. झेप १२. व्यवस्थित १६. शपथ १७. आकाश १९. दासी २०. स्वयंपाकाची कला २१. दहशत २३. दारुमुळे निकामी होणारा अवयव २४. जिन्नस २५. राजाची पत्नी २६. त्वरित २८. वर्ष ३०. हत्ती ३२. सूर्य ३४. भारताच्या दक्षिणेचा समुद्र ३८. वाटाड्या ४०. ओळ ४१. लहान ४२. पाणी ४३. पाणी ४३. समानता ४५. जास्त किमतीचे ४६. व्यापारी ४७. एक कडसर पालेभाजी ४९. मुलाची पत्नी ५०. अपशकुन ५२. पालखी ५३. अश्व ५४. पोहणे ५६. डोके ५७. बूड ५८. रावणाची मुखे ५९. हस्त ६०. पाश्चात्य स्नानपात्र ६१. मार्ग ६२. अपराध्याच्या वतीने घातलेली भीड ६४. छोटा ६६. स्त्री ६८. परिणय ६९. घट्ट ७०. नस ७१. झोप ७३. वात्सल्य ७४. आजार ७६. मिठी ७९. आईची बहीण ८२. पुष्कळ (ग्रामीण) ८४. बंगाली मिठाई प्रकार ८७. रुची, पसंती ८८. विपुल ८९. सरशी

**उभे शब्द**

१. आटोपशीर आकारचे २. भूमी ४. रूढी ५. अंगिकार, स्वीकार ६. वनराज ७. नोकर ९. पुष्कळ ११. जमीन व पाणी यापैकी कोठेही राहू शकणारा सजीव १३. पत्र १४. सूतकताईचे साधन १५. मिश्रण, खिचडी १६. थालिपीठ वा चकलीचे पीठ १८. पूर्वज २२. शक्ती २४. अपमान २५. राजाची आई २७. गांधीजींचे एक तत्त्व २८. सारखा २९. तल्लीन ३१. सुखी माणसाचे वस्त्र ३३. वीर स्त्री ३५. केविलवाणा ३६. कुत्रा (सं.) ३७. आवड ३९. दुर्दैव ४४. प्रासाद ४८. पुन्हा ५१. ताजेपणा ५२. कृपा ५३. स्वयंपाकात तसेच सौंदर्य प्रसाधनातही वापरला जाणारा पिवळे चूर्ण ५४. प्रखर ५५. तृष्णा ५७. झाकीर हुसेन यांचे वाद्य ६०. टिंगल ६३. सहजी ६५. नुकसानकारक ६६. मराठी माणसाची प्रिय करमणूक ६७. शांतता ७२. झुंड ७३. मक्षिका ७५. ताकद ७७. आशीर्वाद ७८. वन, बाग ८०. पारंब्या असलेले झाड ८१. आदर ८३. शाहिराचे वाद्य ८५. सांप्रत ८६. ध्येय

## शब्दकोडे १६० चे उत्तर

**आडवे उत्तर -**

३.सखी ७.गाव ९.अंदाजपत्रक १०.खळबळजनक १३.वारस १४.डावा १५.हारजीत १७.गवत १९.मार २०.खडा २१.धनी २२.नूतन २३.नस २४.तलाव २५.मानव २७.तीन २८.रसभंग ३०.जळ ३१.लड ३३.सडा ३४.साफ ३५.खडतर ३६.हाव ३८.दासी ३९.साल ४०.हवस ४३.नवरी ४५.राख ४६.अटन ४८.डरपोक ५१.कबरस्तान ५२.नवरा ५४.कव ५५.गर्वाचे घर ५६.लत ५८.नवल ६०.वर्धमान ६३.गरिमा ६५.यथा ६७.बाहेरखाली ६८.तगडा ६९.काळीज ७१.खबर ७२.समा ७३.नरमाई ७४.कृतक ७७.चाक ७८.नेता ७९.वीतराग ८०.ब्र ८१.सरकी ८२.गणेश

**उभे**

१.१.सदाशिव २.कापड ३.सकवार ४.जाळ ५.हळवा ६.मानहानी ८.वरात १०.खसखस ११.बडा १२.कर १६.जीवनसत्त्व १७.गवती चहा १८.तनू १९.मानस २१.धवल २२अ.तरफदारी २३.नग २४.तळतळाट २६.वडा २९.भंग ३०.जड ३२.डराव डराव ३५.खल ३७.वन ३९.साखर ४१.सर ४२.चाकवत ४४.वरचेवर ४५.राब ४६.अनल ४७.नन ४९.पोक ५०.लंगडा बाळकृष्ण ५१.करवली ५३.वनमाळी ५७.तग ५९.लय ६१.मातबरी ६२.नगर ६४.रिकामा ६६.थाप मारणे ६७अ.ख्याती ७०.जनता ७२.सकस ७५.कवी ७६.सुरा ७८.नेकी

## घर आणि परिसर स्वच्छ ठेवा

पावसाळा सुरू होण्यापूर्वी प्रत्येक जण आपले घर व आपल्या घराच्या आसपासच्या परिसराची साफसफाई करतात. त्यानंतर पाऊस सुरू झाल्यावर घरासमोरील परिसर हिरवागार दिसत असला तरी घराच्या बाजूचे तीन ते चार फूट असणारी हिरवळ मुळासकट काढून उकिरड्यावर फेकून दिली जाते. त्यामुळे घराच्या बाजूची हिरवळ काढल्याने घर अधिक आकर्षक लांबून दिसते. त्यामुळे सरपटणार्‍या प्राण्यांची भीती सुद्धा दूर होते.

उन्हाळ्यात लोकवस्तीच्या आजूबाजूला किंवा दूरठिकाणी केरकचरा तसेच अस्वच्छता पाहायला मिळते. त्याची खरी स्वच्छता पाऊस मुसळधार पडल्यावर व नद्या तुडुंब भरून वाहू लागल्यावर होते. मागील महिन्यात पावसाने जनजीवन विस्कळीत जरी केले तरी खरी स्वच्छता करून टाकली. पहिल्या पावसाने काही ठिकाणी कचरा वाहून न गेल्याने पाण्यात कचरा कुजल्याने दुर्गंधी येत होती. मी लहान असताना माझी आये म्हणायची. मोठो पावस लागत नाय तोपर्यंत घाण धुपान जाणार नाय. आता अधूनमधून पावसाच्या धारा लागत असल्या तरी मागील महिन्यात धो धो पावसाने सर्व काही धुपून गेले आहे. म्हणजे आता स्वच्छ झाले असे म्हणत असलो तरी अनेकांवर नैसर्गिक संकट आलेले होते. त्यात काहींना जीवाभावाची माणसेही कायमची गमवावी लागली. असे असले तरी आता वर्षभर बघायला नको. ही स्वच्छता नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची असते.

लोक मांगर, झोपडी, चाळ, इमारत, बंगलो आदी ठिकाणी राहतात. ग्रामीण भागात बरीच घरे बंद स्थितीत आहेत. त्यामुळे घराच्या चारी बाजूला गवत वाढल्याने व रात्री रातकिड्यांच्या आवाजामुळे पावसाळ्यामध्ये रात्रीचे भयानक दिसते. कारण बरेच दिवस घर बंद असल्याने अस्वच्छतेचे साम्राज्य दिसून येते. नंतर सणासुदीच्या दिवशी घरमालक आल्यानंतर वाडीतील मंडळींना घेऊन सफाई करतात. मात्र ग्रामीण भागात वेळच्या वेळी सफाई केली नाही, तरी दुर्गंधी किंवा आरोग्याला अपायकारक होत नाही. शहरातील चित्र मात्र वेगळे असते. सुखा कचरा आणि ओला कचरा करा असे वर्गीकरण महानगरपालिका वारंवार सांगत असते. तसे प्लास्टिकचे डबे अर्थात कचरा कुंड्या सुद्धा महानगरपालिकेमार्फत ठिकठिकाणी ठेवले जातात. मात्र आजही त्याचा बर्‍याच प्रमाणात वापर केला जात नाही. काही इमारतीमध्ये खिडकीतून कचरा फेकला जातो. याचा त्रास तळ, पहिल्या आणि दुसर्‍या मजल्यावर राहणार्‍या रहिवाशांना जास्त होतो.

**क्रमश:**

**- रवींद्र तांबे**

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय**- बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

## न्यूज कॉलम

### चांदवडला सहा घरफोडया, टोळी गजाआड

**नाशिक ।** ऑगस्ट संपत आला तरी देखील तालुक्यासह कसमादेत समाधानकारक पाऊस झालेला नाही. पावसाने पाठ फिरविल्याने दुष्काळाचे ढग अधिक गडद होत आहेत. मालेगाव शहरासह कसमादेतील लहान मोठ्या ५२ पाणीपुरवठा योजनांना वरदान ठरलेले चणकापूर धरण ८७ टक्के भरत आले आहे. धरणातील उपलब्ध पाणी ३१ जुलैपर्यंत पुरवावे लागणार असल्याने या योजनांना पाणीटंचाईचा सामना करावा लागणार आहे. पावसाअभावी पाणीपुरवठा योजना देखील संकटात आल्या आहेत. मालेगाव शहराला दिवसाआड होणारा पाणीपुरवठा आता दोन दिवसाआड करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मालेगाव शहराला चणकापूर व गिरणा या दोन्ही धरणातून पाणीपुरवठा केला जातो. चणकापूर व पुनंद ही दोन्ही धरणे साधारणत: ऑगस्टमध्ये भरतात. त्यापूर्वी दोन्ही धरणातून मोठ्या प्रमाणावर विसर्ग होऊन गिरणा नदी पात्रातून पाणी गिरणा धरणात जाते. परिणामी यावर्षी गिरणा धरण आतापर्यंत जेमतेम ३७ टक्के भरले आहे. त्यामुळे गिरणा धरणातून शहराला मर्यादीत पाणी उचलावे लागणार आहे.

# कांद्याच्या प्रश्नांवर ठोस उपाययोजना करण्यासाठी मुंबई येथे बैठक होणार : ना. गिरीष महाजन

**नाशिक । वार्ताहर**



कांद्याच्या मुद्द्यावरुन राज्याचे ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी शनिवारी सकाळी लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीत भेट देऊन कांदा उत्पादक शेतकऱ्यांसह व्यापाऱ्यांच्या अडचणी समजून घेतल्या. कांद्याच्या प्रश्नांवर ठोस उपाययोजना करण्यासाठी मुंबई येथे या आठवड्यात मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री तसेच बाजार समितीतील सर्व संबंधित घटकांची बैठक या आठवड्यात होणार असल्याचे महाजन यांनी या वेळी सांगितले तसेच कांद्याचे अनुदान शेतकऱ्यांच्या खात्यावर एक रकमी कसे येईल यासाठी आपण प्रयत्न करणार असून केंद्र व राज्य शासन नेहमीच शेतकऱ्यांच्या पाठीशी असल्याचे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले.

यावेळी त्यांच्या सोबत जिल्हाधिकारी जलज शर्मा, जिल्हा उपनिबंधक फय्याज मुलानी, लासलगाव बाजार समितीचे सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उपसभापती गणेश डोमाडे, बाजार समिती संचालक पंढरीनाथ थोरे, डी के जगताप, सुवर्णा जगताप, रमेश पालवे, भीमराज काळे, बाजार समितीचे सचिव नरेंद्र वाढवणे यांच्यासह उत्तर महाराष्ट्र प्रभारी विजय चौधरी, जिल्हाध्यक्ष सुनील बच्छाव, दादासाहेब जाधव, भाजपचे(ग्रामीण)जिल्हाध्यक्ष शंकरराव वाघ, प्रकाश पाटील, राजेंद्र चाफेकर, कैलास सोनवणे, निलेश सालकाडे तसेच शेतकरी, व्यापारी उपस्थित होते.

या वेळी महाजन शेतकऱ्यांशी संवाद साधताना म्हणाले की, यावर्षी पाऊस कमी पडल्यामुळे भविष्यात कांद्याचे उत्पादन कमी होणार आहे.त्याचबरोबर देशातील कांदा देशाबाहेर गेला तर देशात कांदा टंचाई भासून कांद्याची भाववाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ही बाब लक्षात घेवून केंद्र सरकारने शेतकरी व ग्राहक हितास प्राधान्य देवून कांदा निर्यातीवर शुल्क लागु केले आहे. असे असले तरीही शेतक-यांचे नुकसान होवू नये याकरिता नाफेड व एन सी सी एफ यांच्यामार्फत २४१० रूपये प्रति क्विंटल दाराने शेतकऱ्यांकडून कांदा खरेदी करण्यात येत आहे. सध्या नाशिक जिल्ह्यात नाफेड चे ४० कांदा खरेदी केंद्र सुरू करण्यात आले आहे त्यामध्ये अजून वाढ करण्यात आली असून आता ६० खरेदी केंद्रावर कांदा खरेदी केला जाणार आहे असल्याचे महाजन यांनी या वेळी सांगितले.

कांद्यावरील निर्यातशुल्काचा निर्णय मागे घ्यावा तसेच नाफेड ने प्रत्यक्षात बाजार समितीत कांदा लिलाव प्रक्रियेत सहभाग घ्यावा अशी जोरदार मागणी यावेळी शेतकऱ्यांनी महाजन यांच्या कडे केली. या वेळी सभापती बाळासाहेब क्षीरसागर, डी के जगताप, प्रकाश पाटील, व्यापारी प्रतिनिधी मनोज जैन, शेतकरी प्रतिनिधी केदार नवले, निवृत्ती न्याहरकर, हिरामण घोटेकर आदींनी आपले मनोगत व्यक्त केले.



# लासलगाव येथे कांदा लिलाव सुरू

**नाशिक । वार्ताहर**

केंद्र सरकारने कांदा निर्यातीवर ४० टक्के शुल्क लावल्याच्या निषेधार्थ लासलगाव सह नाशिक जिल्ह्यातील बाजार समित्या बंद होत्या मात्र काल दि.२५ ऑगस्ट रोजी स पो नि राहुल वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस बंदोबस्तात लासलगाव बाजार समितीत कांद्याचे लिलाव सुरू झाले.६०९ वाहनातून आलेल्या अंदाजे ८ हजार ७६८ क्विंटल कांद्याचे लिलाव झाले.

दि.२५ पासून लिलाव सुरु न केल्यास परवाने रद्द केले जातील असा इशारा जिल्हा उपनिबंधक फय्याज मुलानी यांनी दिल्यामुळे व तहसीलदार शरद घोरपडे यांनी गुरुवारी लासलगाव बाजार समितीत शेतकरी प्रतिनिधी व व्यापारी प्रतिनिधी यांची संयुक्तिक बैठक घेतल्यामुळे लासलगाव येथील व्यापारी लिलावात उतरले व पोलीस बंदोबस्तात लासलगावला लिलाव सुरु झाले. लासलगांव बाजार समितीत ६०९ वाहनातून आलेल्या अंदाजे ८ हजार ७६८ क्विंटल कांद्याचे लिलाव झाले.या कांद्यास कमीत कमी ६०० रु,जास्तीत जास्त २४५५ रु तर सरासरी २२०१ रुपये प्रति क्विंटल दराने बाजारभाव मिळाले.गुरुवारी उशिरा रात्री जिल्हाधिकाऱ्यांनी आदेश देऊन सुद्धा काल शुक्रवारी नाशिक जिल्ह्यातल्या कुठल्याही बाजार समितीत कांदा खरेदीसाठी नाफेड आले नाही.केंद्र सरकार शेतकऱ्यांच्या भावना समजून न घेता शेतकऱ्यांना फक्त शेंडी लावण्याचे काम सरकार करत असल्याचा आरोप कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या वतीने केला जात आहे.केंद्र सरकारने कांदा निर्यातीवर लावलेले ४० टक्के शुल्क तातडीने रद्द करावे अशी मागणी कांदा उत्पादक शेतकरी करत आहे.

# वाणिज्य विभागातील विद्यार्थ्यांना जीएसटी विषयी मार्गदर्शन

**नाशिक । वार्ताहर**

काकासाहेब नगर येथील के.के.वाघ ज्युनिअर कॉलेज येथे वाणिज्य विभागातील इयत्ता अकरावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना लासलगाव महाविद्यालयातील वाणिज्य विभागाचे प्रा.सुनिल गायकर यांनी 'जीएसटी' विषयी सविस्तर मार्गदर्शन केले.जीएसटी अॅक्ट कसा अस्तित्वात आला तसेच या जीएसटीमुळे कोणकोणते बदल झाले आणि जीएसटी मुळे सध्या देशात अप्रत्यक्ष स्वरूपाचा फक्त एकच कर अस्तित्वात असल्याने विविध प्रकारच्या करांपासून ग्राहकांना दिलासा मिळाला तसेच सध्या जीएसटी मुळे या क्षेत्रात वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना अनेक संधी उपलब्ध झाल्या आहेत असे प्रतिपादन प्रा.सुनिल गायकर यांनी यावेळी केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शितल उशीर आणि प्रणिता कुयटे या विद्यार्थिनींनी केले तर प्रास्ताविक प्रा.योगेश पुंड यांनी केले आणि प्रा.किरण शिंदे यांनी आभार मानले.या कार्यक्रमासाठी वाणिज्य विभागाचे प्रा.किरण शिंदे,प्रा.योगेश पुंड,विज्ञान विभागाचे प्रा.विकास शिंदे,प्रा.गणेश आवारे,प्रा. सोनाली आढाव, प्रा.सचिन कोल्हे,प्रा.भाग्यश्री खरक,प्रा. उत्तम कर्वे, प्रा.शादाब शेख,प्रा. संदीप शिंदे,योगेश खैरे व इयत्ता अकरावी आणि बारावी वाणिज्य शाखेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्य शरद कदम यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा.किरण शिंदे,प्रा.योगेश पुंड यांनी परिश्रम घेतले.

### शिवाजी चौकात वाहनांची तोडफोड

**नाशिक ।** येथील शिवाजी चौक परिसरात भरदिवसा खुनाचा घडलेला प्रकार ताजा असतानाच दुसऱ्याच दिवशी शुक्रवारी रात्री अकराच्या सुमारास गावागुंडाची दहशत बघावयास मिळाली.गावगुंडांनी शिवाजी चौक परिसरातील अचानक चौक, कृष्णमंदिर मंदिर चौक व इतर परिसरातील दुचाकी व चारचाकी वाहनांची तोडफोड केली. अचानक झालेल्या प्रकारामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या बाबत अंबड पोलिसांनी दोन संशयितांना ताब्यात घेतल्याचे समजते.

# धर्मवीर आनंद दिघे यांना शिवसेनानाशिक महानगरतर्फे अभिवादन

**नाशिक । प्रतिनिधी**




धर्मवीर आनंद दिघे यांच्या स्मृतीदिनानिमित्त शिवसेना नाशिक महानगराच्या वतीने शिवसेना मध्यवर्ती कार्यालय नाशिक शहर जिल्हा, मायको सर्कल येथे अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी खा. हेमंत गोडसे, महानगर प्रमुख प्रवीण तिदमे, महिला आघाडी सहसंपर्क प्रमुख सुवर्णा मटाले, जिल्हा समन्वयक श्यामला दिक्षित, युवासेना विस्तारक योगेश बेलदार, महानगर संघटक अस्मिता देशमाने, नाशिक ग्रामिण सहसंपर्क प्रमुख गणेश कदम, लोकसभा संघटक योगेश म्हस्के, उप जिल्हाप्रमुख दिगंबर मोगरे, शशिकांत कोठुळे, प्रमोद लासुरे, महेश जोशी, अमोल सूर्यवंशी, माजी नगरसेवक सुर्यकांत लवटे, युवतीसेना जिल्हाप्रमुख हर्षदा गायकर, योगिता ठाकरे, विधानसभा प्रमुख रोशन शिंदे, दिपक मौले, उप महानगर प्रमुख आनंद फरताळे, नाना काळे, अरुण घुगे, प्रमोद जाधव, मनीष खेले, युवासेना जिल्हाप्रमुख रुपेश पालकर, महानगर प्रमुख दिगंबर नाडे, चिटणीस आदित्य बोरस्ते, अमोल जाधव, आकाश पवार, भा.वि.से. महानगर प्रमुख शुभम पाटील, अमोल जोशी, शरद देवरे, कैलास जाधव, योगेश वाणी, नितीन देशमुख, सिमा सिघानिया, ज्योती फड, सनी रोकडे, मंदाकिनी जाधव, अनिता पती, शंतनू सौंदानकर, वृषाली व्यवहारे, रंजना सायखिंडीकर, आरती गायखे, किर्ती ठाकूर, शरदचंद्र नामपूरकर आदी उपस्थित होते.

# गुरु गोबिंद सिंग अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांचा शाश्वत विकास कार्यशाळेत सहभाग

**नाशिक । प्रतिनिधी**



मानवी कल्याणासाठी होत असलेल्या विकासासाठी आता आपण फारच मोठी किमंत चुकवत आहोत, याची जाणीव तरुण पिढीमध्ये देखील येत आहे, आणि ही निश्चितच आशादायक बाब आहे. या संदर्भात नाशिकमधील तरुण उद्योजक वेदांत राठी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी एक कार्यशाळा आयोजित केली होती. माजी पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांनीही त्यात सहभाग नोंदविला.

नाशिकमधील इतर शालेय आणि अभियांत्रिकी विद्यार्थ्यांचा देखील सहभाग लक्षणीय होता. विकासाच्या नावाखाली होणाऱ्या पर्यावरणीय हानीची या कार्यशाळेत दखल घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी इलेक्ट्रिक वाहने कितपत पर्यावरण स्नेही आहेत आणि वाढती शहरे कितपत सुकर जीवन जगण्यास लायक बनत आहेत, यावर उहापोह केला.

पर्यावरण मंत्री म्हणून आदित्य ठाकरे यांनी आरे जंगल कसे वाचविले, हे नमूद केले आणि राजकीय नेते आणि विचारवंत, शास्त्रज्ञ यांनी लोकांच्या जीवनावर विशेषतः येणाऱ्या पिढीवर प्रभाव टाकणाऱ्या पर्यावरणासंबंधी बाबी लक्षात घ्यावात अशी अपेक्षा व्यक्त केली. वेदांत राठी यांनी पर्यावरण पूरक अशा तंत्रज्ञानाची आवश्यकता व्यक्त करत त्या दृष्टीने ते स्वतः आणि त्यांचे उद्योजक सहकारी करत असलेले कार्य विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

### आरोपीला कठोर शिक्षा करावी

**नाशिक ।** विंचूर ता.निफाड येथील १४ वर्षीय अल्पवयीन मुलीवर अत्याचार केलेल्या जुबेर समशेर मेवाती या नराधमाला कठोर शिक्षा करण्यात यावी या मागणीचे लेखी निवेदन लासलगाव पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक राहुल वाघ यांना भारतीय जनता पक्ष लासलगाव,श्री शिवप्रतिष्ठान,बजरंग दल लासलगाव यांच्या वतीने देण्यात आले. विंचूर येथील बजरंग गल्लीत राहत असलेल्या एका वीस वर्षीय तरुणाने नववीत शिकत असलेल्या १४ वर्षीय अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याची घटना नुकतीच घडली आहे.या घटनेतील नराधम जुबेर समशेर मेवाती याने केलेले हे घाणेरडे कृत्य अतिशय निंदनीय आहे.

# धर्मवीर आनंद दिघे यांच्या स्मृतीदिनानिमित्त मुख्यमंत्री शिंदे यांनी दिली नाशिक महानगरासाठी रुग्णवाहिका




**नाशिक । प्रतिनिधी**

धर्मवीर आनंद दिघे यांच्या स्मृतीदिनानिमित्त शिवसेना मुख्यनेते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते डॉ. श्रीकांत शिंदे वैद्यकीय फाऊंडेशनच्या माध्यमातून महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यांसाठी रुग्णवाहिकाचे वाटप करण्यात आले.

नाशिक महानगरासाठी शिवसेना जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते यांच्याकडे रुग्णवाहिकेची चावी सुपूर्त करण्यात आली. याप्रसंगी खा. डॉ. श्रीकांत शिंदे, शिवसेना महाराष्ट्र प्रदेश समन्वयक शिवसेना प्रवक्ते नरेश म्हस्के, शिवसेना सचिव उत्तर महाराष्ट्र संपर्क प्रमुख भाऊसाहेब चौधरी, नाशिक जिल्हा निरीक्षक हेमंत पवार, सह संपर्क प्रमुख चंद्रकांत लवटे, ग्रामीण जिल्हाप्रमुख भाऊलाल तांबडे, माजी नगरसेवक आर. डी. धोंगडे आदी उपस्थित होते.

# शासन आपल्या दारी उपक्रमाला जुने सिडकोत उदंड प्रतिसाद

**नाशिक । प्रतिनिधी**





स्व. धर्मवीर आनंद दिघे यांच्या स्मृतिदिनानिमित्त प्रभाग क्र.२४ मध्ये जनकल्याणकारी शासन आपल्या दारी राबवण्यात आले. समाजातील शेवटच्या व्यक्तींपर्यंत शासनाच्या योजना पोचवण्यासाठी हा उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमात सातत्य ठेवण्याचे गौरवास्पद कार्य शिवसेना महानगरप्रमुख प्रविण (बंटी) तिदमे यांनी यावेळी केले असल्याचे गौरवोद्गार नाशिकचे खासदार हेमंत गोडसे यांनी केले.

कार्यक्रमाचे उद्घाटन खा. हेमंत गोडसे यांच्या हस्ते करण्यात आले. स्व.धर्मवीर आनंद दिघे यांच्या स्मृतिदिनानिमित्त प्रभाग क्र.२४ येथील जुने सिडकोतील नवग्रह शनि मंदिरात जनकल्याणकारी शासन आपल्या दारी राबवण्यात आले. खा. गोडसे यांच्या हस्ते श्री शनी देवाचे पूजन आणि हिंदुहृयसम्राट बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. शासनाच्या योजना समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहचविण्यासाठी हा उपक्रम शहरातील प्रत्येक प्रभागात राबवावा, असे आवाहन शिवसेना महानगरप्रमुख प्रविण (बंटी) तिदमे यांनी शासकीय अधिकाऱ्यांना केले.

उपक्रमात २२५० नागरिकांनी सुविधांचा लाभ घेतला. शासन आपल्या दारी उपक्रमात जिल्हा पुरवठा विभाग, जिल्हा उद्योग केंद्र, समाज कल्याण विभाग, पोस्ट विभाग, नाशिक महापालिका, महिला आर्थिक विकास महामंडळ, राष्ट्रीय क्षय रोग विभाग, कौशल्य विकास विभाग आणि आपले सरकार केंद्र धारकांचा समावेश होता. यात विविध लाभार्थ्यांना एकाच छताखाली शासकीय योजनांचा लाभ देण्यात आला.

अभियानाच्या उद्घाटनप्रसंगी शिवसेना सहसंपर्क प्रमुख गणेश कदम, सुवर्णा मटाले, नाशिक लोकसभा संघटक योगेश म्हस्के, युवासेना प्रमुख विस्तारक योगेश बेलदार, जिल्हाप्रमुख रुपेश पालकर, महानगरप्रमुख दिगंबर नाडे, उपजिल्हाप्रमुख अमोल सूर्यवंशी, प्रमोद लासुरे, विद्यार्थीसेना जिल्हाप्रमुख किरण फडोळ, विद्यार्थीसेना महानगरप्रमुख शुभम पाटील, रोशन शिंदे, आनंद फडतले, महिला आघाडी महानगरप्रमुख अस्मिता देशमाने, पश्चिम विधानसभा समन्वयक सुलोचना मोहिते, ज्योती फड, मंदाकिनी जाधव, रंजना साईखेडेकर, आरती गायके, अमित मांडवे, आकाश पवार, आतिश काळे, अमोल जाधव, राजेंद्र मोहिते, धवल डरंगे, अजय पंडित, यांच्यासह प्रभाग क्र.२४ मधील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेतकऱ्यांचे विद्युत पंप चोरणारी टोळी जेरबंद

**नाशिक । प्रतिनिधी**

येथील वावी पोलिस ठाण्याच्या हद्दीत शेतकऱ्यांच्या विद्युत पंपाच्याचोरीची दहशत माजवणाऱ्या टोळीला जेरबंद करण्यात स्थानिक गुन्हे शाखेच्या विभागाला यश आले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, गेल्या दोन ते तीन वर्षांपासून वावी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शेतकऱ्यांचे विद्युत पंप चोरी जाण्याचे प्रकार घडत होते. मात्र, याचा थांगपत्ता लागत नव्हता. त्यानंतर वावी पोलीस ठाण्यात नव्याने रुजू झालेले सहाय्यक पोलीस निरीक्षक चेतन लोखंडे यांनी या गोष्टीचा सुगावा घेत वावी परिसरातील दोन संशयित आरोपींना ताब्यात घेतले होते. मात्र, त्यांच्यावर कठोर कारवाई न झाल्याने हे दोन्ही संशयित आरोपी वावी गावात पुन्हा मोकाट फिरत होते. यानंतर स्थानिक गुन्हे शाखेच्या टीमला विद्युत पंप चोरणाऱ्या दत्तात्रय रघुनाथ सापते, श्रीपत दिनकर पवार, निवृत्ती सोपान माळी, राधेश्याम चौहान या चार संशयित आरोपींना पकडण्यात यश आले असून त्यातील मुख्य सुत्रधार दत्तू सापते यास पोलिसांनी आपल्या खाक्या दाखवत त्याची अधिक चौकशी केली असता आतापर्यंत जवळपास ३० ते ३५ विद्युत पंप चोरल्याची कबुली दिली आहे. तसेच सदर चोरीचे पंप विकत घेणाऱ्यास देखील पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

CMYK



## न्यूज कॉलम

### धनदाईनगर येथे म्युझिकल एक्सरसाइज योगा

**धुळे।** शहरातील स्टेडियमजवळील धनदाईनगर येथे योगगुरू अशोक शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील १७ म्युझिकल एक्झरसाइज योगा केंद्रांचा महायोगा कार्यक्रम झाला. शहरातील जवळपास ४०८ योगसाधक व योगसेवक धनदाईनगर येथील साई गणेश मंदिराच्या ग्राउंडवर यासाठी उपस्थित होते. महापौर प्रतिभा चौधरी अध्यक्षस्थानी होत्या. राष्ट्रवादी काँग्रेसचे धुळे शहर जिल्हाध्यक्ष रणजित भोसले, प्रजापिता ब्रह्माकुमारी केंद्राच्या प्रमुख कवितादीदी, योगगुरू शिंदे, साई गणेश मंदिराचे अध्यक्ष वाय. एस. पाटील आदी उपस्थित होते. महापौर श्रीमती चौधरी म्हणाल्या, की मी गेल्या दोन वर्षापासून रोज म्युझिकल योगा करत आहे. त्यामुळेच माझी तब्येतही उत्तम आहे. धनदाईनगर म्युझिकल योगा ग्रुपचे योगसेवक सतीश शिंपी यांनी सूत्रसंचालन केले.

# चिंचखेडा, अंचाळे येथे दोन ट्रान्सफार्मर मंजुर

**एकूण १६ लक्ष रुपये निधीची तरतूद**

**धुळे । प्रतिनिधी**

शेतकर्यांच्या शेतीला सुरळीत व वेळेवर वीज पुरवठा व्हावा म्हणून धुळे ग्रामीणचे आ.कुणाल पाटील यांच्या विशेष प्रयत्नातून धुळे तालुक्यातील चिंचखेडा आणि अंचाळे येथील शेतकर्यांच्या कृषी पंपासाठी दोन ट्रान्स्फार्मर व २३ वीजेचे खांब मंजुर करण्यात आले आहेत. या कामासाठी एकूण १६ लक्ष रुपयांचा निधी आ.पाटील यांनी मंजुर करुन घेतला आहे. चिंचखेडा व अंचाळे कृषीपंपासाठी ट्रान्सफार्मर मंजुर करण्यात यावेत म्हणून आ.कुणाल पाटील यांच्याकडे बाजार समितीचे सभापती



बाजीराव पाटील यांनी पाठपुरावा केला होता.

धुळे तालुक्यातील चिंचखेडा व अंचाळे शिवारातील जुन्या ट्रान्सफार्मर व वीजभार वाढल्याने वारंवार वीज पुरवठा खंडीत होत असे. तसेच ट्रान्सफार्मर नादुरुस्त होण्याचेही प्रमाण वाढले होते. परिणामी शेतकर्यांच्या पिकांचे मोठे नुकसान होवून आर्थिक फटका सहन करावा लागत असे. त्यामुळे नवीन ट्रान्सफार्मर बसविण्याची मागणी चिंचखेडा व अंचाळे येथील शेतकर्यांनी केली होती. त्यानुसार धुळे बाजार समितीचे सभापती बाजीराव पाटील यांनी आ.कुणाल पाटील यांच्याकडे नवीन दोन ट्रान्सफार्मर व वीजेचे पोल मंजुर करण्यासाठी पाठपुरावा केला होता. शेतकर्यांची मागणी लक्षात घेवून आ.कुणाल पाटील जिल्हा नियोजन समितीकडे निधीची शिफारस केली. त्यामुळे चिंचखेडा व अंचाळे शिवारासाठी दोन ठिकाणी एकूण ६३ केव्हीए क्षमतेचे नवीन ट्रान्सफार्मर मंजुर करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे २३ वीजेचे पोलही मंजुर झाले आहेत. या कामासाठी एकूण १६ लक्ष रुपयाचा निधी मंजुर झाला आहे. ट्रान्सफार्मर मंजुरीसाठी प्रशासकीय पातळीवर अधिक्षक अभियंता श्री भामरे,उपकार्यकारी अभि. चव्हाण, सहा.अभियंता भूषण मांडवड, श्री सोनवणे, वरीष्ठ तंत्रज्ञ भूषण देसले, समाधान पाटील यांचे सहकार्य मिळाले. चिंचखेडा आणि अंचाळे कृषी पंपासाठी ट्रान्सफार्मर मंजुर करुन दिल्याबद्दल आ.कुणाल पाटील यांचे चिंचखेडा येथील शेतकरी अनिल पाटील, भरत पाटील, योगेश वाणी, आनंदा गोबा पाटील, छोटू अमृतकर, जिजाबराव पाटील, अंचाळे येथील परशुराम पाटील, भटू पाटील, चंद्रसिंग पाटील, योगेश पाटील यांनी आभार मानले आहेत.

# वरुळ येथे मानव विकास मिशन अंतर्गत २५ विद्यार्थिनींना सायकल वाटप




**शिरपूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील वरुळ येथील एच. आर. पटेल कन्या विद्यालयात मानव विकास मिशन अंतर्गत २५ विद्यार्थिनींना सायकल वाटप करण्यात आले. आर. सी. पटेल एज्युकेशनल ट्रस्टचे अध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल यांच्या वाढदिवस निमित्त विद्यालयात विविध कार्यक्रम घेण्यात आले.

एस. व्ही. के. एम. संस्थेचे ट्रस्टी विवेक वैद्य, शिरपूर एज्युकेशन सोसायटी ट्रस्टी सौ. कृतीबेन भूपेशभाई पटेल, मुकेश पटेल चॅरिटेबल ट्रस्ट डायरेक्टर कु. द्वेता भूपेशभाई पटेल, सौ. सीमा वैद्य, पंचायत समिती शिक्षण विस्तार अधिकारी एफ. के. गायकवाड, संस्थेचे सीईओ डॉ. उमेश शर्मा, प्राचार्य एन. सी. पवार, प्राचार्य व्ही. पी. दिक्षित, विद्यालयाचे प्राचार्य एस. एन. जोशी, सरपंच नरेंद्र मराठे, पंचक्रोशीतील अनेक मान्यवर, सरपंच व ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल यांच्या वाढदिवसानिमित्त उपस्थित सर्व मान्यवर, विद्यार्थिनी, शिक्षक व कर्मचारी यांनी शुभेच्छा दिल्या. विद्यालयाचे प्राचार्य एस. एन. जोशी व इंग्लिश मिडीयम प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सपना मराठे यांनी शाल व पुष्पगुच्छ देवून सर्व मान्यवरांचे स्वागत केले. यावेळी कृतीबेन पटेल यांच्या हस्ते अत्याधुनिक कम्प्युटर लॅबचे उद्घाटन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते परीसरातून लांब अंतराहून येणाऱ्या २५ विद्यार्थिनींना शासनाच्या मानव विकास मिशन अंतर्गत सायकल वाटप करण्यात आले. तसेच विद्यालयाच्या प्रांगणात कु. द्वेता दिदी पटेल यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एस. सी. शिंपी यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

# शिरपूर तालुकास्तरीय शासकीय मुलींच्या खो-खो स्पर्धेचे उद्‌घाटन

**शिरपूर । प्रतिनिधी**

शहरातील आर.सी.पटेल मराठी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात शालेय खो खो १४ वर्षे, १७ वर्षे व १९ वर्षे मुलींच्या स्पर्धा १९ ऑगस्ट रोजी घेण्यात आल्या. यात एकूण २२ संघांनी सहभाग नोंदविला.

प्रमुख पाहुणे व उद्घाटक शिरपूर पोलीस उपनिरीक्षक छाया पाटील, प्राचार्य आर.बी. पाटील, तालुका क्रीडा समन्वयक प्रा.राधेश्याम पाटील, खो-खो राष्ट्रीय खेळाडू अनिता पावरा, तालुका क्रीडा समिती सदस्य व्ही.ई.सिसोदे, प्रा.राहुल स्वर्गे, तुषार माळी, जिग्नेश पराडके, क्रीडा शिक्षक आर.यु.चौधरी, आर.एस.चव्हाण, मुरलीधर चित्ते, तारासिंग पावरा, विरेंद्र जाधव,



मयुर बोरसे, कृष्णा पाडवी, किसन पावरा उपस्थित होते. शिरपूर तालुका शारीरिक शिक्षण व क्रीडा शिक्षक महासंघ अध्यक्ष मनोज पाटील यांनी सूत्रसंचलन केले. प्रमुख पाहुण्यांचे स्वागत खो खो मार्गदर्शक करण शिंदे व यांनी केले. तालुका शासकीय खो-खो स्पर्धेत मुलींच्या संघांनी सहभाग घेतला. विजयी संघ : १४ वर्षे वयोगटात मुली एच.आर. पटेल मराठी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय शिरपूर, १७ वर्षे वयोगटात मुली सावित्रीबाई कन्या माध्य. विद्यालय शिरपूर, १९ वर्षे वयोगटात मुली एच.आर.पटेल कन्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय शिरपूरचे संघ विजयी झाले. पंच म्हणून विक्की धनगर, पियुष भोई, हर्षल पाटील, राहुल पवार, जयेश पाटील, गौरव सपकाळे, निखिल पाटील, गुणलेखक हर्षल राजपूत, सलोनी पावरा यांनी काम पाहिले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी मनोज पाटील, राधेश्याम पाटील, करण शिंदे व सागर माळी यांनी संयोजन केले.

### प्राथमिक शिक्षक समितीचे सामूहिक रजा आंदोलन

**बोरीस ।** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांमधील विद्यार्थी शिक्षकांच्या प्रलंबित मागण्यांसाठी ५ सप्टेंबरला शिक्षक दिनानिमित्त सामूहिक रजा आंदोलन करण्याचा निर्णय राज्य प्राथमिक शिक्षक समितीने घेतला आहे. प्राथमिक शिक्षक समितीने मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, शिक्षक मंत्री आणि प्रधान सचिवांकडे विविध ३२ मागण्या केल्या आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शिक्षकांच्या बाबतीत शासन नेहमी दुय्यम भूमिका घेत असल्याचे समितीने म्हटले आहे. सातत्याने भेटी, निवेदने देवूनही मागण्यांची दखल शासन घेत नाही. जिल्हा परिषद, नगर पालिका, महानगर पालिका शिक्षकांच्या मागण्यांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याने शिक्षक दिनाच्या दिवशी ५ सप्टेंबरला सामूहिक रजा आंदोलन करण्याचा निर्णय समितीने घेतला आहे.

# राज्यातील ३ लाख ३६ हजार शेतकऱ्यांच्या खात्यावर ४६५.९९ कोटींचे कांदा अनुदान होणार जमा

**मंत्री छगन भुजबळ यांची माहिती**

**नाशिक । प्रतिनिधी**

राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून राज्यातील राज्यातील ३ लाख ३६ हजार पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर ४६५.९९ कोटींचे कांदा अनुदान जमा होणार असल्याची माहिती राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी दिली.

काल नाशिकरोड रेल्वे स्थानकात दाखल झाल्यानंतर येथील उपस्थित माध्यम प्रतिनिधींशी त्यांनी संवाद साधला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी ते म्हणाले की, आज राज्याच्या पणन विभागाचे सह सचिव डॉ.सुग्रीव धपाटे यांच्याशी कांदा अनुदानाबाबत चर्चा करून अनुदान वितरण करण्याबाबत माहिती घेतली. त्यानुसार ४६५.९९ कोटीची रक्कम वित्त विभागाने पणन विभागाला वर्ग केली आहे. येत्या दोन- तीन दिवसांत राज्यातील ३ लाख ३६ हजार पात्र लाभार्थ्यांच्या खात्यात जमा होणार आहे. त्यामुळे राज्यभरातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी ते पुढे म्हणाले की, राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना प्रति क्विंटल ३५० रुपये अनुदान देण्याचा शासनाने यापूर्वीच निर्णय घेतलेला होता. राज्यातील सुमारे ३ लाख ३६ हजार ४०० शेतकऱ्यांसाठी ८४४ कोटी रुपये अनुदान अपेक्षित होते. त्यापैकी पुरवणी अर्थसंकल्पात ५५० कोटीची मागणी मंजूर करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले.

ते म्हणाले की, वित्त विभागाने ४६५.९९ कोटींचा निधी वितरित केला आहे. अजूनही ३७८ कोटी निधी आवश्यक आहे. उर्वरित निधी लवकरच आकस्मिक खर्चातून किंवा डिसेंबर २०२३ च्या पुरवणी अर्थसंकल्पातून दिला जाईल. एकट्या नाशिक जिल्ह्याचा विचार केला तर १ लाख ७२ हजार शेतकऱ्यांसाठी ४३५ कोटी आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

ते म्हणाले की, कांदा विक्री केलेल्या पात्र शेतकऱ्यांना दोन हप्त्यामध्ये हे पैसे दिले जाणार आहे. शासनाचा सर्वांना प्रमाणात अनुदान देण्याचा विचार आहे. म्हणजे लहान-लहान शेतकऱ्यांना एकाच हप्त्यात संपूर्ण लाभ मिळेल.

येवल्यात नाफेड कांदा खरेदी सुरू करण्याचे निर्देश

यावेळी ना. छगन भुजबळ म्हणाले की, नाशिक जिल्ह्यात नाफेड संस्थेच्या वतीने कांदा खरेदी केंद्र सुरू करण्यात आले आहे. यामध्ये येवला तालुक्यातील व परिसरातील शेतकऱ्यांना कांदा विक्री करण्यात यावा यासाठी येवल्यात नाफेड कांदा खरेदी केंद्र सुरू करण्याबाबत नाफेडचे अधिकारी निखिल पाडाडे यांच्याशी चर्चा करून सूचना केल्या आहे.

# तळवाडे येथील पोलीस पाटीलपदी सविता पाटील

**चिमठाणे । प्रतिनिधी**

अमळनेर तालुक्यातील तळवाडे येथील पोलीस पाटील पद रिक्त होते. अमळनेर विभागात नुकतीच पोलीस पाटील पदाची भरती काढुन परीक्षा घेण्यात आली.यात शिंदखेडा तालुक्यातील भडणे येथील सविता लोटन पाटील ही लेक असून अमळनेर तालुक्यातील तळवाडे येथील शेखर रवींद्र पाटील यांची पत्नी आहेत. नुकत्याच घेण्यात आलेल्या पोलीस पाटील च्या परीक्षेत सर्वोत्तम गुण व परीक्षेच्या आधारावर लेखी व तोंडी परीक्षेत घवघवीत यश संपादन करून अमळनेरचे प्रांत अधिकारी महादेव खेडकर यांनी पारदर्शक भरती करून अंतिम यादी प्रसिद्ध करण्यात आली.



यावेळी तळवाडे येथील पोलीस पाटील पदी सविता लोटन पाटील यांची निवड करण्यात आल्याने तळवाडे गावाची पोलीस पाटील पदाची जबाबदारी या तरुण सुशिक्षित मितभाषी एक अभ्यासू महिलेची निवड झाल्याने गावात कायदा तसेच सुव्यवस्था व महसूल विभागातील कामकाजात मदत होणार आहे. गावकऱ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या त्यांच्या निवडीबद्दल भडणे येथील आदर्श पुरस्कार प्राप्त पोलीस पाटील युवराज माळी यांनी अभिनंदन केले.

# मनपातर्फे पालकमंत्री यांच्या उपस्थितीत पंचप्रण शपथ

**नाशिक । प्रतिनिधी**

भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव समारोप या कार्यक्रमाअंतर्गत नाशिक महापालिकेच्या स्थायी समिती सभागृहात पालकमंत्री दादा भुसे व प्रशासक तथा आयुक्त डॉ.अशोक करंजकर, आ. देवयानी फरांदे, आ.सीमा हिरे यांच्या प्रमुख उपस्थितीत शहरातील विविध सामाजिक संस्थांच्या पदाधिकाऱ्यांना मनपाचे जनसंपर्क अधिकारी योगेश कमोद यांनी पंचप्रण शपथ दिली.

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या समारोपीय कार्यक्रमानिमित्त केंद्र शासनाच्या निर्देशानुसार नाशिक मनपाच्या वतीने ९ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट दरम्यान 'मेरी मिट्टी मेरा देश' या अभियाना अंतर्गत नाशिक शहरातील विविध सामाजिक संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी पंचप्रण शपथ नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री दादाजी भुसे यांच्या उपस्थितीत शपथ



घेतली. पंचप्रण शपथ नाशिक शहरातील मनपा सर्व शाळेतील विद्यार्थी, शिक्षक, नाशिक मनपातील सर्व अधिकारी, कर्मचारी यांनी ही शपथ घेतली.

यावेळी अतिरिक्त आयुक्त भाग्यश्री बानायत, प्रदीप चौधरी, उपायुक्त लक्ष्मीकांत साताळकर, श्रीकांत पवार, प्रशांत पाटील, नितीन नेर, शिक्षण अधिकारी बी.टी.पाटील, नाशिक सिटीझन फोरमचे माजी अध्यक्ष जितुभाई ठक्कर, हेमंत राठी, फोरमचे संस्थापक अध्यक्ष विक्रम सारडा, आर्किटेक्ट सचिन गुळवे, रामकृष्ण आरोग्य संस्थेचे स्वामी कंठानंद महाराज, नाशिक क्रेडाईचे अध्यक्ष कृणाल पाटील, निमाचे अध्यक्ष धनंजय बेळे, सचिव राजेंद्र अहिरे, आयमाचे अध्यक्ष निखील पांचाळ, तानचे सागर वाघचौरे, डॉ. श्रीया कुलकर्णी, सचिन जोशी, उमेश वानखेडे, रवी महाजन आदींसह भाजपचे महानगरप्रमुख प्रशांत जाधव, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते, प्रवीण तिदमे, सुधाकर बडगुजर, रंजन ठाकरे, गजानन शेलार, प्रशांत दिवे, सचिन अहिरराव, संदीप कुयाटे, भारती जाधव, नाशिक शहरातील विविध पक्षांचे पदाधिकारी नाशिक मनपाचे सर्व अधिकारी आणि विविध स्वयंसेवी संस्थांचे पदाधिकारी यांनी पंचप्रण शपथ घेऊन देशभक्तीचा जागर केला.

# दोंडाईचा शहर व ग्रामिण व्यावसायिक फोटोग्राफर असोसिएशनची कार्यकारणी गठीत

**दोंडाईचा । प्रतिनिधी**

दोंडाईचा शहर व ग्रामीण सन २०२३ - २४ करिता अध्यक्ष म्हणून समाधान पाटील, उपाध्यक्ष रविंद्र जावरे, सचिव नितीन सावंत, सहसचिव भिकन पाटील, खजिनदार मुकेश पाटील, कार्याध्यक्ष अनिकेत चौधरी, मार्गदर्शक ए टी पाटील सर, राजेंद्र चौधरी, गजानन शंकपाळ यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.

धुळे जिल्हा व्यावसायिक फोटोग्राफर असोसीसीएन तर्फे स्वागत करण्यात आले व १९ ऑगस्ट जाकतीक फोटोग्राफर दिवस साजरा करण्यात आला. व रक्त दान शिबीर, गुणवंत विध्यार्थी चा सत्कार करण्यात आला व आयोजित बैठकीत विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. ईश्वर अग्रवाल, अनिल पाटील, धनराज महाजन, देवेंद्र चौधरी, नरेंद्र गिरासे, चेतन पाटील, कृष्णा अग्रवाल, मनोज मालचे, पंकज पाटील, महेंद्र पाटील, कैलास साळुंखे, अरुण पाटील, सुनील गिरासे, विवेक पाटील, प्रवीण मिस्तरी,मयूर ढोले, दीपक जाधव, उज्वल पाटील, रोहन गिरासे, शाम रामोळे, अंकुश पाटील, राधेश्याम गोसावी, प्रवीण मासाळ,जगदीश सोनजे, नंदलाल निकम, निंबा मगरे, अजय बागले, दिपक कोळी, सोमेश्वर पाटील, राजेंद्र बैसाणे, सचिन गिरासे, हिम्मत निकम यांचा देखील कार्यकारिणीत समावेश आहे.

# शेकडो समर्थ सेवेकऱ्यांचे श्रमदान

**नाशिक । प्रतिनिधी**

श्री स्वामी समर्थ सेवामार्ग आणि श्री समर्थ गुरुपीठ त्र्यंबकेश्वरच्या वतीने गेल्या वर्षभरापासून हाती घेण्यात आलेल्या गंगा गोदावरी स्वच्छता अभियाना अंतर्गत रविवारी गोदा घाट परिसरात सव्वा दोनशे महिला पुरुष सेवेकऱ्यांनी श्रमदान करत परिसरात स्वच्छता केली. यासोबतच गोरगरिबांना वस्त्रदान करण्यात आले आणि मोफत आरोग्य शिबिरात शेकडो रुग्णांची मोफत तपासणी करून मोफत औषधोपचार करण्यात आला.

या सर्व उपक्रमात समर्थ गुरुपीठ महाव्यवस्थापक चंद्रकांतदादा मोरे यांनी हजेरी तर लावलीच पण स्वतः श्रमदानात सहभागी होऊन सेवेकरी व भाविकांचा उत्साह वाढविला. गोदाकाठ परिसरातील बालाजी कोट श्री स्वामी समर्थ केंद्रात सर्व सेवेकरी या अभियानासाठी एकत्रित झाले असता चंद्रकांतदादा मोरे यांनी मार्गदर्शन



केले. सेवेकऱ्यांशी संवाद साधताना ते म्हणाले, समर्थ सेवामार्ग गेली पंच्याहत्तर वर्ष समाजातील गोरगरिबांना दुःखमुक्त, व्याधीमुक्त करण्यासाठी अहोरात्र काम करीत आहे. समाजातील अज्ञान, अनारोग्य, अस्वछता दूर करून ज्ञान, आरोग्य, स्वच्छतेचा मंत्र देऊन समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोचून काम करीत आहे. आज सेवामार्ग नाशिक जिल्ह्यापर्यंतच मर्यादित राहिला नसून तो राज्याच्याच नव्हे तर देशाच्या सीमा पार करून जगभर विस्तारला आहे. अधिक आणि श्रावण मासाच्या काळात आपण हे स्वच्छता अभियान राबवत असल्यामुळे गंगागोदावरी मातेची अल्पशी सेवा करण्याची पर्वणी साधणारे आपण सर्व सेवेकरी मोठे भाग्यवान आहोत असे सांगून त्यांनी आपल्या प्रत्येक सण, वारामागे विज्ञान कसे दडले आहे ते स्पष्ट करताना अनेक उदाहरणं दिली. नागपंचमीला आपण आघाड्याचे पान पूजेत वापरतो. आघाडाच का? कारण आषाढ, श्रावण, भाद्रपद या महिन्यात सापांचा वावर शेती, घराच्या परिसरात वाढतो. खरे तर तो शेतकऱ्यांचा मित्र आहे पण कळत नकळत त्याला आपणाकडून त्रास झाल्यास तो चावा घेऊ शकतो अश्यावेळी हे आघाड्याचे पान सर्पदंशावर औषध म्हणून काम करते. गणपतीला आपण ज्या दुर्वा वाहतो त्या पोटाच्या अनेक विकारात उपयुक्त आहेत. अशी अनेक छोटी मोठी उदाहरणं देऊन मोरे यांनी सांगितलं की, आपल्या पूर्वजांनी विज्ञान अध्यात्माची सांगड घातली आहे. याप्रसंगी सेवा मार्गाचे जिल्हा प्रमुख घोडेराव यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. तर सेवेकरी बारसे तात्या यांनी स्वच्छता कार्यात सहभागी सेवेकऱ्यांना टोप्यांचे मोफत वाटप केले. गत चौदा महिन्यांपासून ही मोहीम अखंडितपणे राबविण्यात येत आहे.

### मराठा समाजाचा राज्यस्तरीय वधु-वर परिचय मेळावा

**धुळे ।** नाशिक जिल्हा मराठा समाज उत्कर्ष संस्था आयोजित राज्यस्तरीय भव्य वधु वर परिचय मेळावा रविवार दि २७ ऑगस्ट २०२३ रोजी भावबंधन मंगल कार्यालय, गंगापूर नाका मखमलाबाद रोड, हनुमान वाडी,नाशिक येथे आयोजन केले आहे. मेळाव्यासाठी विवाह इच्छुक मुलगा अथवा मुलगी यांनी उपस्थित असणे बंधनकारक आहे.मेळाव्यात सौ.दिशा राकेश काकडे ह्या सुरेल जुनी, नवीन मराठी, हिंदी गाणी सादर करतील अधिक माहितीसाठी प्रकाश चव्हाण मो. नं.८००७२३२४२०, अशोक देवकर मो. नं.८००७४३३१४४ यांच्याशी भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे.


## पाहिजेत

**कार्यालयीन/ऑफीस कामकाजाकरिता मराठी, इंग्रजी टंकलेखक तसेच संगणकाचे Tally,Execl, Word चे ज्ञान असलेले मुलगा/मुलगी कामकाजाकरिता तात्काळ पाहिजेत.**

: संपर्क :

**ॲड.विलास डी.झाल्टे/ ॲड.सिध्दांत व्ही.झाल्टे**

पत्ता: १५,१६ दिघे ॲडव्होकेट चेंबर्स, स्टेशन रोड, धुळे.

**मो:९१५६२६९९९९ भेटण्याची वेळ : १२ ते ६ पर्यंत**

CMYK

दैनिक
लक्ष महाराष्ट्र





# पाऊस लांबल्याने पिकांनी टाकल्या माना

## धुळे तालुक्यातील शेतकरी संकटात : जिल्हा दुष्काळाच्या उंबरठ्यावर









धुळे । तालुक्यात शासनाच्या खरीप हंगामात टंचाईच्या उपायोजना करण्यासाठी चालढकल केल्यामुळे तालुक्यातील खरीप पिकासह, चाऱ्यासाठी पशुधन संकटात सापडले आहे. तालुक्यातील शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी शासनाचे डोळे कधी उघडणार असा प्रश्न शेतकरी वर्गातून विचारला जात आहे. दरवर्षी खरीप हंगामात वेळेवर पावसाला सुरुवात केल्यास तालुक्यामधील शेतकऱ्यांना खरीप पिके व जनावरांसाठी हिरवा चारा उपलब्ध होतो. परंतु यंदा पावसाने ओढ दिल्यामुळे खरीप पिके संकटात सापडली.यंदा तालुक्यात बाजरी, तूर, मका,कांदा या पिकाचा विमा भरला ते शेतकरी देखील सध्या चिंतेत सापडले. पावसाने ओढ दिल्यामुळे सगळी पिके अडचणीत आली. नदीकाठ व कालवा क्षेत्र वगळता तालुक्यातील पूर्ण क्षेत्र हे खरीप पावसावर अवलंबून आहे.यंदा उजनी धरण पुरेसे न भरल्यामुळे भविष्यात त्या क्षेत्रातील पिकावरही परीणाम जाणवणार आहे.खरीपसाठी देखील पाणी सोडण्यास विलंब झाल्यामुळे ती पिके देखील अधिक अडचणीत आली. गतवर्षी खरीप हंगामात पिक विमा देताना विमा कंपनीने देखील सवतीची वागणूक देत नुकसान झालेल्या शेतकऱ्यांचे वेळेत तक्रार करूनही पंचनामेच केले नाहीत तर शासकीय मदत दोनच महसूल मंडळाला भरपाई देऊन उर्वरित सहा मंडळ मधील शेतकरी वंचित ठेवले. सध्या शासनाच्या उदासीन धोरणाचा फटका देखील तालुक्यातील शेतकऱ्यांना मोठा फटका बसू लागला. या दरम्यान जमिनीतील पाण्यावर पिके उगवून आली. मोठ्या पावसानंतर शिडकाव्याच्या पावसाने त्या पिकांना जगवले होते. पण गेल्या आठवड्यापासून उन्हामुळे उगवलेली पिके हातात येतील की नाही अशी शंका येत होती. या कालावधीत शेतकऱ्यांनी आंतरमशागतीची कामे करुन ठेवली आहेत. पिकांची वाढ चांगली आहे. पण आता गरज पावसाची आहे.

दैनिक
लक्ष महाराष्ट्र





# श्रावण महिन्याच्या प्रारंभीच फूलबाजार कडाडला

## पाऊस उशिरा सुरू झाल्यामुळे आवक कमी झाली : श्रावण महिना असल्याने विविध धार्मिक कार्यक्रम

















धुळे । व्रतवैकल्याचा मानला जाणारा श्रावण महिना आणि सणाच्या निमित्ताने केली जाणारी भगवंताची पूजा आणि त्यासाठी वापरण्यात येणाऱ्या विपूल प्रमाणातील फुलांमुळे सोलापुरातील फूल बाजार कडाडला असून, पाऊस उशिरा सुरू झाल्यामुळे आवक कमी झाली आहे. त्यातच श्रावणात मागणी अधिक असल्यामुळे फुलांचे दर वाढले आहेत. दरम्यान, धुळे शहरातील बाजार समिती, फुलवला चौक आदी भागात फूलविक्रेते आहेत. याबाबत माहिती देताना फूलविक्रेते यांनी सांगितले की, पांढरी शेवंती, पिवळा धमक व भडक केशरी झेंडू, नाजूक जुई, जांभळ्या निळ्या रंगाचा अष्टर अशा अनेक प्रकारच्या फुलांनी श्रावणमासाची शोभा वाढविली जाते. शंभू महादेवाचा सोमवार, मंगळागौरीचा मंगळवार, महालक्ष्मीचा शुक्रवार आणि फुलांची विशेषतः यामुळे त्या त्या दिवशी विविध रंगांच्या फुलांचा मान असतो. फुलांचा खपदेखील भक्तांच्या श्रद्धेवरच अवलंबून आहे. यामुळे श्रावणानिमित्त देवाच्या चरणापासून मुकुटापर्यंत फुलांची आकर्षक रचना करुन श्रावण मासाच्या पूजेचे महत्त्व अधोरेखित भक्तांमधून होत असते असेही त्यांनी सांगितले श्रावणाच्या निमित्ताने मंदिरामधून शिवलिंगाची पूजा तसेच घराघरातून महालक्ष्मीची पूजा केली जाते. रंगीबेरंगी फुलांची आरास करुन फुलांमधून विविध प्रतिमा साकारल्या जात आहेत. यामुळे फुलाचा आविष्कार श्रावणात व्रतवैकल्यांच्या माध्यमातून दिसून येतो. श्रावणात घरोघरी प्रथेप्रमाणे सत्यनारायण पूजा केली जाते. यामुळे या पूजेच्या निमित्ताने सत्यनारायणावर वाहण्यासाठी फुले वापरली जातात.

ग्राउंड रिपोर्ट : पुरुषोत्तम पाटील